संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहमदनगर, शनिवार दि. ०७.१२.२०२४ | अंक नं. २३४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
**महावीर पेन्शन ठेव योजना**
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्ट्स को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय कातेड (संस्थापक) Mo. 9372444001

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
**मे. हरीभाकाजी देडगांवकर**
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

प्रशस्त दालन | प्रशस्त वाहनतळ | होलसेल विभाग | विनम्र सेवा
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
**राजपाल**™
**बस्ता बांधायला यायचं हं!**
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सुरक्षा तुमची सर्व्हिस आमची
CCTV Camera Set 9999/-
घर, हॉटेल, अपार्टमेंट, कॉलेज, शाळा
**गोल्डन एंटरप्रायजेस**
दिल्लीगेट, अहिल्यानगर
7304099919

BAJAJ — The World's Favourite Indian — 70 Countries
**स्टॉक क्लिअरन्स सेल**
₹ 5000 सुट
३१ डिसेंबर २०२४ पर्यंतच्या प्रत्येक मॉडेल वर
हमखास सुट
Platina 100 | Platina 110 | CT 110 X ₹3000 सुट
बजाज बाईकचे अधिकृत विक्रेते
**छत्रपती बजाज**
नगर पुणे रोड, कायनेटिक चौक, अहमदनगर 9175142881 / 8605210312
नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर 8087203861 / 9767786895

**ऑफिसबॉय** (2 जागा) पाहिजेत
दहावी/बारावी पास नापास
इच्छुक उमेदवारांनी आपल्या सविस्तर अर्ज-बायोडाटासह खालील पत्त्यावर 3 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
**निर्मल**
अर्बन बँक कॉलनी, बुरुडगांव रोड, अहमदनगर 98900 18888
ॲडव्हर्टायझिंग । प्रिंटर्स । डिस्प्ले सोल्युशन
क्षमतेनुसार पगार दिला जाईल.

**पाहिजेत**
अहमदनगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदूकाका ज्वेल्स, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत.
सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
**कॅशियर**
जागा : (पु.) 5
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
विविध ठिकाणचा अनुभव असल्यास प्राधान्य
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह शनिवार ते बुधवार सकाळी 11 ते 1 यावेळेत समक्ष भेटावे.
**चंदुकाका ज्वेल्स**
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

आपके शहर में पहली बार
**भारतीय क्राफ्ट उत्सव**
३ डिसेंबरपासून सुरू..
खास आकर्षण
लखनवी चिकन सुट, सहारनपुर फर्नीचर, राजस्थानी बांगड्या, राजस्थानी पेंटिंग्स्, बनारसी साड्या, पश्चिम बंगाल साड्या, चंदेरी सिल्क साड्या, बेड कव्हर्स, दिवान सेट, केरळ ज्वेलरी, सतरंजी, मोजडी, फॅन्सी चप्पल, लेदर बॅग्स्, टॉप्स, टी-शर्ट्स, कारपेट, पंजाबी सुट, मंगलगिरी ड्रेस मटेरिअल्स, जयपुरी जूती, ब्लॉक प्रिंट, खुर्जा क्रॉकरी, टेराकोटा वगैरे
विविध प्रकारच्या हॅन्डीक्राफ्ट व हॅन्डलूम बनावटीच्या वस्तु सवलतीच्या दरात खरेदी करण्याची सुवर्ण संधी !
मोफत प्रवेश व पार्किंग
स्थळ - **तांबटकर माळा ग्राउंड** पारिजात कॉर्नर चौक, गुलमोहर रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
वेळ : सकाळी 10.30 ते रात्री 10.00 पर्यंत

सॅनिटरी प्रोडक्ट्स वर मिळवा...
नामांकित कंपन्यांचे
JOHNSON TILES | Jaquar | GRAVITY | SONET
10% UPTO 50% OFF
**मे. अभय सेल्स**
कॉर्पोरेशन हार्डवेअर
9145008009 / 9822542011

हार्दिक अभिनंदन
मा.श्री. देवेंद्र फडणवीस यांची २१ व्या महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!
भारतीय जनता पार्टी
वकील आघाडी सर्व पदाधिकारी व वकील बंधू, मित्रमंडळी
अहिल्यानगर

महायुती
शिवसेना
**महाराष्ट्राचा बुलंद आवाज**
आमचे मार्गदर्शक.. आधारस्तंभ..
**मा. नामदार अजितदादा पवार**
यांची महाराष्ट्राच्या
उपमुख्यमंत्री पदी
निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन
अहिल्यानगर महायुतीच्या सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन !
मा.आ. राधाकृष्ण विखे पा. | मा.आ. शिवाजीराव कर्डीले | मा.आ. काशिनाथ दाते | मा.आ.डॉ. किरण लहामटे | मा.आ. संग्रामभैय्या जगताप
मा.आ. मोनिकाताई राजळे | मा.आ. विठ्ठलराव लंघे | मा.आ. आशुतोष काळे | मा.आ. अमोल खताळ | मा.आ. विक्रमसिंह पाचपुते
**प्रशांत छायाबाई सबाजीराव गायकवाड**
मा. जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अ.नगर
Only SMS & 9822287715 Follow :

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधायुक्त
**इंडो आयरिश हॉस्पिटल**
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
**मोफत सर्व रोग तपासणी शिबीर**
दि. २५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडून)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
* मोफत ॲन्जीओप्लास्टी
* माफत डायलेसीस/किडनी विकार
* माफत कर्करोग शस्त्रक्रिया
* मोफत नवजात अतिदक्षता विभाग
* मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनेग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
* शिबीरस्थळ *
**इंडो आयरिश हॉस्पिटल**
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336, मो. 9130423336, 9860310001
टिप : नांव नोंदणी आवश्यक | मोफत ओ.पी.डी.

पुन्हा एकदा शिबीर
* कान - वचळलेले कान चिटकवा
* नाक - सर्दी खोकला उपाय
* डोळा - मोतीबींदुसाठी ड्रॉप वापरा
* स्कीन - टॅटू+मोस+गोंधन काढणे
काळेडाग पिंपल्स खाज येणे
डॉ.मंजुषा 7507718246

भारतरत्न,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र कोटी कोटी अभिवादन...
**मा.श्री. अविनाश देडगांवकर**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार विजेते समाजसेवक । अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## 'अबोली' पुस्तकातून कोकण सफर

विद्या प्रभु लिखित 'अबोली' हे पुस्तक जुन्या, निसर्गरम्य कोकणची सफर लीलया घडवतो. कोकणप्रेमी वाचकांना या पुस्तकाचे वाचन द्विगुणित आनंद देईल.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. महेश केळुसकर या पुस्तकाविषयी सांगतात– आता सगळे जगच बदलायला लागल्यावर मालवणी मुलखालाही बदलणं भाग होते. १९८०–८५ पर्यंत सर्वसाधारणपणे 'कोकणची माणसं साधी भोळी... काळजात त्यांच्या भरली शहाळी...' असा प्रकार चालला होता. निसर्ग खरोखरच रम्य होता आणि कोकणातल्या माणुसकीलाही आंब्या–फणसांचा धमधमाट आणि ओवळीच्या वळेसरांचा परिमळ होता. मालवणी लोक देवाधर्माला वचकून होते.

मग राजकारणानं आपलं रूप पालटलं अन् भर दिवसा मुंबई–कोकण–गोवा हाववेवर खून मारामाऱ्या व्हायला लागल्या. हिरवेगार डोंगर बोडखे होऊ लागले.

वाचनीय मननीय
प्रेरणादायी
अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



खाणमालकांचे बुलडोझर्स मुलखात गुरगुरु लागले अन् बड्या ट्रॉलर्सवाल्यांनीही समुद्रात मारामाऱ्या सुरू केल्या. मालवणी मुलुख अस्वस्थ झाला... पण त्याच्या आधी...

लेखिका विद्या प्रभु यांच्या 'अबोली'मध्ये जे कोकण आपल्याला भेटतं ते आहे जुन्या मालवणी मुलखाचं रम्य 'सुमरान', एक नितांत रमणीय अशी दक्षिण कोकणची स्मरणयात्रा. अलीकडच्या काळात ललितगद्याचा एवढा मनोज्ञ आविष्कार मराठीत कुणी केलेला नसेल असं भावस्पर्शित्त्व अबोलीमधल्या प्रत्येक ललित लेखाला लाभलं आहे.

बाय द वे तुम्ही कधी कोकणात फिरलाय? नसल्यास एकदा तरी नक्की जाऊन या. नागमोडी घाट, रस्ते, कौलारु घरे, नारळ पोफळी काजूच्या बागा, हापूसचा घमघमाट, फणसासम कोकणी माणसं... केवळ अनुभवनीय...

# पोलिस अधिकारी–कर्मचाऱ्यांना फोनवर अश्लील शिवीगाळ; अधिकारी व राजकीय नेत्यांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी

नगर – एका इसमाने पोलिस ठाण्यात फोन करून महिला पोलिस कर्मचारी, पोलिस अधिकारी यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत नगर मधील प्रशासकीय अधिकाऱ्यांसह राजकीय नेत्यांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिल्याचा प्रकार शुक्रवारी (दि.६) सायंकाळी ७.३० च्या सुमारास शहरातील कोतवाली पोलिस ठाण्यात घडला. या प्रकरणी पोलिसांनी फोन करणारा भाऊसाहेब नारायण शिंदे (रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबतची माहिती अशी की कोतवाली पोलिस ठाण्यातील लँडलाईन फोन नंबर (०२४१) २४१६११७ यावर मोबाईल नंबर ८२६३०३३३७१ यावरुन शुक्रवारी सायंकाळी ७.३० च्या सुमारास फोन आला. तो एका महिला अंमलदाराने उचलला. समोरुन फोन करणारा म्हणाला की मी चिचोंडी पाटील येथुन भाऊसाहेब नारायण शिंदे बोलतोय, तु कोण बोलत आहे, तेव्हा त्यांनी त्यास नाव सांगितले असता त्याने अश्लिल भाषा वापरून फोन कट केला. त्यावेळी महीला पोलिस अंमलदाराने याबाबत पोलिस कॉन्स्टेबल तानाजी पवार यांना हा प्रकार सांगितला.

त्यानंतर तानाजी पवार यांनी फोन करणारा इसम भाऊसाहेब शिंदे यास त्याचे ८२६३०३३३७१ या नंबरवर फोन केला असता त्यांना देखील त्याने अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर महीला पोलिस अंमलदार व तानाजी पवार यांनी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना याबाबत सांगितले. त्याचवेळी भाऊसाहेब शिंदे याने कोठुन तरी पोलीस निरीक्षक दराडे यांचा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्यांना देखील त्याचे ८२६३०३३३७१ या नंबर वरुन फोन करून शिवीगाळ केली. तसेच प्रशासकीय अधिकारी व राजकीय पुढारी यांना मी बॉम्बस्फोट करुन उडवुन देईल अशी धमकी दिली व त्यांच्याबाबतही अर्वाच्य व अश्लिल भाषेत शिवीगाळ केली.

या प्रकरणी महिला पोलिस अंमलदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भाऊसाहेब शिंदे नावाच्या व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

## सेंट्रींगचे काम करताना विजेचा शॉक बसल्याने तरुणाचा मृत्यू

### निंबळक बायपास चौकातील घटना

नगर – नवीन इमारतीत सेंट्रींगचे काम करताना विजेचा शॉक बसून भिंगार मधील तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.६) दुपारी निंबळक बायपास चौक परिसरातील शिंदे वस्ती येथे घडली. गौरव महादेव आढाव (वय २४, रा. महेश नगर, भिंगार) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मयत गौरव हा त्याच्या इतर सहकाऱ्यांच्या सोबत निंबळक बायपास चौक परिसरातील शिंदे वस्ती येथे सुरु असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाच्या ठिकाणी शुक्रवारी दुपारी सेंट्रींगचे काम करत होता. हे काम करत असताना त्याला विजेचा शॉक बसला. त्यामुळे तो खाली पडून बेशुद्ध झाला. त्याला त्याचा सहकारी आकाश क्षेत्रे (रा. भिंगार) व इतरांनी खाजगी वाहनाने दुपारी २.३० च्या सुमारास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात आणले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. बटुळे यांनी त्याची तपासणी करून त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तशी माहिती दवाखाना ड्युटीवर असलेले तोफखाना पोलिस ठाण्याचे स.फौ. गोर्डे यांनी एमआयडीसी पोलिसांना कळविली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत गौरव याच्या मृतदेहाचे शनिवारी (दि.७) सकाळी जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यानंतर त्याच्यावर भिंगार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## कत्तलीसाठी चालविलेल्या ३५ वासरांची सुटका; आवाज येवू नये म्हणून तोंडाला लावल्या पट्ट्या

नगर – पिक अप गाडीतून बेकायदेशीरपणे कत्तलीसाठी घेऊन जात असलेल्या सुमारे ३५ गोवंशीय वासरांची नगर तालुका पोलिसांनी गोरक्षकांच्या मदतीने सुटका केली आहे. नगर पुणे महामार्गावर चास शिवारात भोलेनाथ हॉटेल समोर ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पिक अप चालकाविरोधात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि भारतीय प्राणी संरक्षण कायद्यांतर्गत नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत गोरक्षक अविनाश संतोष सरोदे (वय २४ रा. वाळुंज, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. निलेश काळे (वय ३२, रा. औसरी बुद्रुक, ता. आंबेगाव, जि. पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या वाहनचालकाचे नाव आहे. नगर– पुणे महामार्गावर चास (ता. नगर) शिवारात एक महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप गाडी (क्र.एमएच १४ सीपी ९४३०) संशयितरित्या नगरकडे जाताना गोरक्षक अविनाश सरोदे व त्याच्या सहकाऱ्यांना दिसली.

त्यांना याबाबत संशय आल्याने त्यांनी गाडीचा पाठलाग सुरु करून नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच स.पो.नि. प्रल्हाद गिते, पोलिस अंमलदार खंडेराव शिंदे, आबासाहेब झावरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तो पर्यंत गोरक्षकांनी सदर पिक अप चास शिवारात भोलेनाथ हॉटेल समोर अडवला. पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जावून पिक अप ची पाहणी केली असता त्यात सुमारे ३५ गोवंशीय वासरे दाटीवाटीने कोंबलेली आढळली. तसेच या वासरांचा ओरडण्याचा आवाज येवू नये म्हणून सर्व वासरांच्या तोंडाला चिकटपट्ट्या लावलेल्या दिसून आल्या.

या वासरांच्या वाहतुकीबाबत वाहनचालकाकडे कुठलीही परवानगी आढळून आली नाही. तसेच त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांनी पिक अप गाडी व जनावरे पंचासमक्ष ताब्यात घेतली. सदरची जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याचा संशयावरून पिक अप चालक निलेश काळे याच्या विरूध्द तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पो.हे.कॉ. खंडेराव शिंदे करत आहेत.



## आ. संग्राम जगताप यांनी विधानसभेत श्रीरामाच्या जयघोषात घेतली शपथ

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर शनिवार पासून मुंबईत राज्यातील नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीसाठी विशेष अधिवेशनास सुरुवात झाली आहे. या अधिवेशनात संग्राम जगताप यांनी शनिवारी दुपारी शपथ घेतली. यावेळी त्यांनी मी पार्वती अरुणकाका जगताप असा उल्लेख करून संविधानाची शपथ घेतल्यावर शेवटी जयहिंद, जयभीम व जय श्रीराम असा जयघोष केला.

## शेतात विजेचा शॉक बसून केडगाव मधील एकाचा मृत्यू

नगर – शेतात हरबऱ्याच्या पिकाला पाणी देत असताना रोहित्राचा ताण दिलेल्या तारेत वीज प्रवाह उतरलेला असताना त्या तारेला स्पर्श झाल्याने विजेचा शॉक बसून केडगाव मधील एकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.६) सकाळी ९.३० च्या सुमारास मांडवगण (ता. श्रीगोंदा) शिवारात घडली. शनेश्वर उर्फ राजेंद्र ज्ञानदेव राऊत (वय ५०, रा. भुषणनगर, केडगाव असे मयताचे नाव आहे.



राजेंद्र राऊत

मयत राऊत यांचे भुषणनगर येथे इलेक्ट्रिक दुकान असून श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथे त्यांची शेतजमीन आहे. या शेतात त्यांनी हरबरा पेरलेला आहे. या हरबऱ्याच्या पिकाला पाणी देण्यासाठी ते शुक्रवारी (दि.६) सकाळी केडगाव येथून मांडवगण येथे गेले होते. तेथे शेतात पाणी देत असताना त्यांच्या शेताच्या बांधावर असलेल्या विद्युत रोहित्रात तांत्रिक बिघाड होवून रोहित्राचा ताण दिलेल्या तारेत वीज प्रवाह उतरला. या तारेला त्यांचा स्पर्श झाल्याने त्यांना जोरदार शॉक बसून ते बेशुद्ध झाले. परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी श्रीगोंदा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तेथेच त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत राऊत यांच्यावर शुक्रवारी सायंकाळी केडगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, २ मुले, १ भाऊ असा परिवार आहे.

# भिंगार परिसरातील मटका अड्ड्यांवर छापेमारी

**पाच जणांवर गुन्हे दाखल, स्थानिक गुन्हे शाखेचे कारवाई**

नगर – बेकायदेशीररित्या लोकांकडून पैसे घेऊन कागदाच्या चिठ्ठ्यावर आकडे टाकून कल्याण मटका जुगार चालवणाऱ्या मटका जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून पाच हजार तीनशे तीस रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून पाच जणांना ताब्यात घेतले. ही कारवाई भिंगार परिसरातील बाजारतळ, पाथर्डी रोडवरील बारा बाभळी, बुऱ्हाणनगर रोडवरील व्हिडिओकॉन कंपनी जवळ केली.

याबाबतची माहिती अशी की भिंगार परिसरात मोठ्या प्रमाणावर मटका जुगार सुरु असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांना मिळाली. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या पथकाने शुक्रवारी (दि.६) भिंगार परिसरातील मटका जुगार अड्ड्यावर छापे टाकले. यामध्ये बुऱ्हाणनगर रोडवरील व्हिडिओकॉन जवळील टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकून गणेश गोरख गाडेकर (वय ४०, रा. नागरदेवळे ) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून १ हजार २० रुपये, व मटका जुगारीचे साधने असा मुद्देमाल जप्त केला.

दुसऱ्या कारवाईत बाजार तळावर असलेल्या राजू भाऊराव पवार (वय ५० रा. नेहरू कॉलनी, भिंगार) याच्या मटका टपरीवर छापा टाकून त्यास ताब्यात घेतले व त्याच्याकडून १ हजार १० रुपये रोख रक्कम व मटका जुगारी करीता लागणारे साधने असा मुद्देमाल जप्त केला.

तिसऱ्या कारवाईत बाजार तळावरील विजय संपत पवार (वय ३८, रा. नागरदेवळे ) यांच्या टपरीवर छापा टाकून १ हजार ११० रुपयाची रोकड आणि मटका जुगारीचे साधने असा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत विजय पवार यास ताब्यात घेतले.

चौथ्या कारवाईत पाथर्डी रोडवरील वडारवाडी येथे सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकून शिवाजी दिनकर धिवर (वय ४२, रा. भिंगार) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून १हजार१५० रुपयाची रोकड व मटका जुगारीची साधने असा मुद्देमाल जप्त केला.

पाचव्या कारवाईत पाथर्डी रोडवरील बाराबाभळी येथील मटका जुगार अड्ड्यावर छापा टाकून मंगेश सखाराम खरे (वय ३९, रा. भिंगार) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील १हजार १६० रुपये, आणी मटका जुगारीचे साधने असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये पाच वेगवेगळ्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली.

# जमिनीवर अतिक्रमण करत उभारल्या झोपड्या

**शेतमालकाला केली दमबाजी, ८ ते १० महिलांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

नगर – नगर शहरातील किराणा दुकानदाराच्या वाटेफळ (ता. नगर) गावच्या शिवारात असलेल्या शेत जमिनीत अनोळखी ८ ते १० महिलांनी अतिक्रमण करत कापडी झोपड्या उभारल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत विचारणा करण्यास गेलेल्या शेतमालकालाच दमबाजी करण्यात आली. या प्रकरणी त्या अनोळखी महिलांवर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संतोष फुलचंद गांधी (वय ५६, रा.शांती विहार कॉलनी, सारसनगर) यांनी शुक्रवारी (दि.६) दुपारी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे सारसनगर येथे किराणा दुकान असून त्यांची नगर तालुक्यातील वाटेफळ गावच्या शिवारात गट नंबर ६० मध्ये १ हेक्टर ६१ आर एवढी शेत जमीन आहे. फिर्यादी गांधी हे गुरुवारी (दि.५) सकाळी शेत जमिनीत फेरफटका मारण्यासाठी गेले असता त्यांना त्यांच्या शेतात ५ कापडी झोपड्या उभारल्याचे दिसून आले.

त्यांनी तेथे जावून पाहणी केली असता तेथे ८ ते १० अनोळखी महिला होत्या. त्यांना गांधी यांनी माझ्या शेतात झोपड्या का बांधल्या अशी विचारणा केली असता, त्या महिलांनी गांधी यांना दमबाजी सुरु केली. आम्ही येथेच राहणार आहोत, ही जागा आमची आहे. आमच्या नादी लागू नका अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अनोळखी ८ ते १० महिलांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास स.फौ. रमेश गांगुर्डे हे करीत आहेत.

## फुस लावून अल्पवयीन मुलीला नगरमधून पळविले

नगर – नगर शहरासह जिल्ह्यात अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेण्याच्या घटना वाढतच असून अशीच आणखी एक घटना नगर शहरात घडली आहे. एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना तपोवन रोड वरील सूर्यनगर परिसरात गुरुवारी (दि.५) सायंकाळी ५ ते ५.३० च्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सदर अल्पवयीन मुलीच्या आईने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिलेची १६ वर्षे वयाची मुलगी घरीच असते. ती गुरुवारी (दि.५) सायंकाळी ५ ते ५.३० च्या दरम्यान घरातून बेपत्ता झाली. बराच वेळ झाला तरी मुलगी घरी न आल्याने फिर्यादी व तिच्या कुटुंबीयांनी आजुबाजुच्या परीसरात शोध घेतला व तिच्या मैत्रिणकडे विचारणा केली असता काहीही माहिती भेटली नसुन ती कोठेही मिळुन आली नाही. त्यामुळे आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर महिलेने शुक्रवारी (दि.६) सायंकाळी तोफखाना पोलीस ठाण्यात दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## राजेश शिंदे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील निवृत्त स्थापत्य अभियंता सहाय्यक राजेश शिंदे (वय ७०) यांचे ४ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. सिध्दीबाग येथील सिध्देश्वर वारकरी मंडळाचे भजन कीर्तनात सक्रिय सहभागी होत. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, १ मुलगा, भाऊ, वहिनी असा परिवार आहे.



## सेवानिवृत्त प्राचार्य अशोक सांगळे यांचे निधन

नगर – येथील सेवानिवृत्त प्राचार्य अशोक रामचंद्र सांगळे (वय ७४) यांचे निधन झाले. मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या डी.एड. महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी अनेक वर्ष सेवा दिली.



त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, चार भाऊ, तीन बहीण असा परिवार आहे. सिव्हिल हडको येथील क्रांती तरुण मंडळाचे सुजित सांगळे व ऋषिकेश यांचे ते वडील होत. त्यांच्यावर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# १ लाख ४ हजार रुपयांची सुगंधी तंबाखू, पानमसाल्याचा साठा पकडला

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – शेवगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत १ लाख ४ हजार रुपयांची सुगंधी तंबाखू जप्त केली. याप्रकरणी ६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून ३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबत पो.कॉ.शिवाजी ढाकणे यांनी फिर्याद दिली आहे.

बिलाल मोहंमद हनिफ तांबोळी (वय ३४), अरबाज मोहंमद रफीक तांबोळी (वय २२), अजीम फारूक तांबोळी (वय ४१), (सर्व रा. खालची वेस, काझी गल्ली, शेवगाव), अख्तर महेबूब आंबेकर (रा. ता. पैठण), दादासाहेब अंकुश जाधव, आदिनाथ अंकुश जाधव (दोघे, रा. ता. गेवराई) या सहा जणांविरोधात अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार पो. हे. कॉ. संतोष लोंढे, पो. कॉ. किशोर शिरसाठ, पो.कॉ.आदिनाथ शिरसाठ, पो.कॉ.शिवाजी ढाकणे तसेच शेवगाव पोलिस ठाण्याच्या महिला पोलिस कॉन्स्टेबल गीतांजली पाथरकर यांच्या पथकाने शेवगाव येथील खालची वेस येथे राहणारे बिलाल, अरबाज व अजीम तांबोळी यांच्या घराची झडती घेतली. तेथे १ लाख ४ हजार ४२० रुपयांची विविध कंपन्यांची ५७६ सुगंधी पानमसाला, तंबाखूची पाकिटे आढळून आली. सर्व पानमसाला अख्तर आंबेकर, दादासाहेब जाधव, आदिनाथ जाधव यांच्याकडून विक्रीसाठी घेतल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी शेवगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक धरमसिंग सुंदरडे करीत आहेत.



शेवगाव येथे सुगंधी तंबाखू, पानमसाल्याचा साठा पकडल्यावर आरोपींच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# गृहिणी

## आरोग्य

### कोमट पाणी पिण्याचे लाभ

हिवाळ्यात कोमट पाणी पिणे आरोग्यासाठी चांगले मानले जाते. हे केवळ पाचन तंत्र सुधारत नाही तर रक्त परिसंचरण सुधारते आणि तणाव कमी करते. मात्र, खूप गरम पाणी प्यायल्यास त्याचे काही दुष्परिणाम होऊ शकतात. कोमट पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते.

गॅस आणि बद्धकोष्ठता यांसारख्या पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी हे उपयुक्त आहे. गरम पाणी शरीरातील विषारी घटक काढून टाकण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचा देखील चमकदार होते.

## पाककला

### रवा आप्पे

**साहित्य :** १ कप रवा, १ कप दही, १/२ कप पाणी, १ छोटा कांदा, १ गाजर, १ हिरवी मिरची, १/४ कप कोथिंबीर, मीठ चवीनुसार, १/२ मोहरी, ८-१० कढी पत्ता, २ चमचे तेल, १/२ चम्मच बेकिंग सोडा

**कृती :** सर्वात आधी एका भांड्यात रवा घ्यावा. त्यात समान प्रमाणात दही घालावे. जर घट्ट वाटत असेल तर त्यात थोडे पाणी घालून पीठ तयार करावे. आता अर्धा तास भिजत ठेवावे. रवा फुगल्यावर सर्व चिरलेल्या भाज्या त्यात मिक्स कराव्या. यानंतर मीठ घालावे. आता तुम्हाला फोडणी तयार करण्यासाठी एका कढईत तेल गरम करून मोहरी घालावी. मोहरी तडतडायला लागली की त्यात कढीपत्ता घालावा. आता हा तडका पिठात मिक्स करावा व शेवटी बेकिंग सोडा घालवा. व मिक्स करून घ्यावे. आता अप्पे पात्र गरम करून आणि ब्रशच्या मदतीने त्यात तेल लावावे. तेल लावल्यानंतर चमच्याच्या साहाय्याने पीठ भरावे. शेवटी झाकून मध्यम आचेवर शिजवावे. रवा आप्पे नारळाच्या चटणीबरोबर सर्व्ह करावे.

## वास्तू

### असा असावा स्टडी टेबल

* टेबल नेहमी आयताकृती असावे, गोलाकार किंवा अंडाकृती नसावे.
* टेबल टॉपचा रंग पांढरा, दुधाळ किंवा मलई असेल किंवा इतर रंग फिकट असतील तर उत्तम. साधा काच देखील ठेवू शकता.
* अभ्यास करताना टेबलावर फक्त विषयाशी संबंधित पुस्तके आणि आवश्यक साधने ठेवा.

## सल्ला

सकाळ संध्याकाळ अभ्यास कक्षाच्या मंदिरात कापूर किंवा शुद्ध तुपाचा दिवा आणि सुगंधी अगरबत्ती लावा.

## सौंदर्य

लिप बाम ओठांच्या पृष्ठभागावर एक थर तयार करतो, ज्यामुळे ओलावा बंद होतो आणि ओठ मऊ राहतात. लिप बाममध्ये असलेले मेण, पॅराफिन, लॅनोलिन इत्यादी ओठांना कोरडे ठेवतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ८ डिसेंबर २०२४

**भानुसप्तमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, शततारा १६।०३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : यात्रा संभवते. नातेवाईकांच्या भेटी होतील.

**वृषभ** : स्थायी संपत्ती संबंधी कामांना आज टाळाल. दिवस सामान्य जाईल.

**मिथुन** : व्यापारात कर्मचाऱ्यांवर जास्त विश्वास ठेऊ नका. प्रतिष्ठा वृद्धि योग.

**कर्क** : सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति.

**सिंह** : सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. नवीन संबंध बनतील. सत्संग होईल.

**कन्या** : वाणी प्रभावामुळे लोकांना आपले मत पटवून द्याल. सामाजिक कामात सक्रिय भागीदारी.

**तूळ** : लांबच्या नातेवाईकांकडून चांगली बातमी कळू शकेल.

**वृश्चिक** : आर्थिक स्थिति चांगली राहील.

**धनु** : धार्मिक कामात मन रमेल. शैक्षणिक क्षेत्रात येणाऱ्या अडचणी संभवतात.

**मकर** : ज्ञान, आध्यात्माच्या उच्चस्तरीय कामात गूढ अनुसंधान योग.

**कुंभ** : कर्मकांड अध्यात्म संबंधी कामात मन रमेल. कर्जाची चिंता कमी होईल. मागील उधारी वसुल होईल.

**मीन** : संबंधांना महत्व द्याल. नवीन कार्ययोजनेचे प्रबळ योग.व्यापार स्थिर राहिल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

**बायको** – नेहमी माझं अर्ध डोक दुखत राहते. वाटतंय डॉक्टरला दाखवायला हवं
**नवरा** – अरे त्यात काय दाखवायचं! जितकं आहे तितकंच दुखणार ना!
बस्स! तेव्हापासून नवऱ्याचे संपूर्ण अंग दुखत आहे.

# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* चागोस अर्थिपेलोगो बेटांचा शोध कोणी लावला? – फ्रेंच
* बांग्लादेशाला कोणत्या वर्षी स्वातंत्र्य मिळाले? – २६ मार्च १९७१
* सायप्रसपर्यंत प्रथम कोण पोहोचले? – ग्रीक
* कोणत्या देशाने सर्वप्रथम 'ख्रिश्चन' हा धर्म स्विकारला? – जॉर्जिया

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०६६ 

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | ■ | |
| ९ | | ■ | १० | | | ■ | |
| ■ | | ■ | | ■ | ११ | १२ | |
| १३ | | १४ | | ■ | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | १५ | १६ | | १७ |
| १८ | १९ | | ■ | २० | | ■ | |
| २१ | | | ■ | | ■ | २२ | |

**आडवे शब्द :-** १) स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान – पंडित ++++++ नेहरू ७) क्षणिक; पातळ; चंचल ८) कुबेराचे सेवक ९) धमनी; रक्तवाहिनी; शीर, दिवंगत १०) एक मराठी आडनाव; एक दिवंगत मराठी अभिनेता रवींद्र +++ ११) एक राजा; वि. स. खांडेकर यांची ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झालेली कादंबरी १३) उंट हकणारा १५) लोणी १८) उणीव; कमतरता; कसर २०) अनेक कुटुंबे रहात असलेले मोठे घर २१) मोठे गाव; शहर २२) गुच्छ; झुबका (चाव्यांचा वगैरे)

**उभे शब्द :-** १) काळजीपूर्वक रक्षण; संगोपन २) उत्तराधिकारी; हक्कदार ३) शेतीच्या उपयोगाचे एक अवजार; नांगर ४) योग्य; पात्र ५) लक्ष वेधून घेणारे; दर्शनीय ६) राजा हरिश्चंद्राची पत्नी १०) दांत घासण्याची पूड १२) रजनी; रात्र १३) इमारतोपयोगी एक किमतीवान लाकूड व त्याचे झाड १४) पुन्हा पुन्हा १५) पलंग विणण्याची कापडी पट्टी १६) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ १७) एक चर्मवाद्य १९) वस्तू; डाग; पर्वत

### शब्दगंध क्र. ७०६५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | गो | प | न | ■ | बो | क | ड |
| त | ■ | द | र | व | ळ | ■ | ळ |
| ती | र | क | मा | न | ■ | वा | म |
| ■ | ज | ■ | ई | ■ | ट | क | ळी |
| पा | त | क | ■ | फु | र | स | त |
| ठ | ■ | प | क्ष | ■ | फ | ■ | ■ |
| ला | थ | ■ | ■ | ब | ल | दं | ड |
| ग | र | बा | ■ | | ■ | ग | र |

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : श्रद्धा असावी अंद्धश्रद्धा नको

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### जन्मानंतर मुलाचा रंग काळा का दिसतो?

ही एक सामान्य प्रक्रिया आहे. बऱ्याच पालकांना असे वाटते की त्यांचे बाळ जन्मतः गोरे होते, परंतु काही आठवड्यांनंतर त्याच्या त्वचेचा रंग काळा किंवा गडद का होतो. यामागील कारणे आणि ही प्रक्रिया का होते ते समजून घेऊ. जन्माच्या वेळी बाळाची त्वचा गोरी दिसते कारण: त्वचेचा अपूर्ण विकास: त्वचेचा बाह्य थर (एपिडर्मिस) जन्माच्या वेळी पूर्णपणे विकसित झालेला नसतो. नवजात मुलामध्ये त्वचेच्या रंगासाठी जबाबदार असलेल्या मेलेनिन नावाच्या रंगद्रव्याचे उत्पादन खूपच कमी असते. गर्भाशयातील बाळाची त्वचा गर्भाशयाच्या द्रवाने झाकलेली असते, जी पांढरी दिसते. काही आठवड्यांनंतर, मेलेनिनचे उत्पादन वाढू लागते, ज्यामुळे त्वचेचा रंग गडद होऊ शकतो. बाह्य वातावरण, जसे की सूर्यकिरण, तुमच्या बाळाच्या त्वचेवर परिणाम करू शकतात. बाळाच्या पालकांच्या त्वचेचा रंग त्याच्या अनुवांशिक वैशिष्ट्यांवर प्रभाव टाकतो. त्वचा कालांतराने बाह्य वातावरणाशी जुळवून घेते. ६ ते १२ महिन्यांच्या वयात बाळाचा कायमचा रंग विकसित होतो. यानंतर त्वचेचा रंग अधिकतर स्थिर होतो. बाळाच्या त्वचेला नेहमी ओलावा ठेवा. उन्हात जास्त वेळ घालवू नका. तुमच्या बाळासाठी सौम्य आणि नैसर्गिक उत्पादने वापरा. आईचे दूध बाळाच्या त्वचेसाठी आणि आरोग्यासाठी फायदेशीर आहे. बाळाच्या त्वचेतील बदल हे सहसा चिंतेचे कारण नसतात. पुरळ उठणे किंवा जास्त कोरडेपणा यासारखी कोणतीही असामान्य लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. बाळाचा रंग जन्माच्या वेळी गोरा आणि नंतर गडद होणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे. यामागे वैज्ञानिक आणि पर्यावरणीय कारणे आहेत. पालकांनी हा बदल नैसर्गिक मानून बाळाच्या त्वचेची योग्य काळजी घ्यावी.

## अतिविश्वास फळ

एका घनदाट जंगलामध्ये मदोत्कट नावाचा एक सिंह राहायचा. वाघ, कावळा आणि कोल्हा हे तीन त्याचे सेवेकरी होते. एकदा त्यांनी एका उंटाला पाहिले जो त्याच्या कळपापासून भटकला होता. उंटाला पाहून सिंह म्हणू लागला की, हा कोणता प्राणी आहे जाऊन तपास करून या. यावर कावळा म्हणाला की, महाराज हा उंट आहे. तुम्ही याची शिकार करू शकतात.

सिंह म्हणाला की, आपल्या इथे आलेल्या अतिथीला मी मारत नाही. त्याला माझ्याजवळ घेऊन या मी त्याला इथे येण्यामागचे कारण विचारेल. कावळा उंटाजवळ गेला व त्याला आदराने सिंहाजवळ घेऊन आला. उंटाने सिंहाला प्रणाम केला व खाली बसला. सिंहाने त्याला जंगलात येण्यामागचे कारण विचारले तर त्याने सांगितले की, मी रस्ता भटकलो आहे. सिंहाने त्याला राहण्यासाठी आग्रह धरला व आता उंट सिंहाजवळ राहू लागला.

काही दिवसानंतर सिंहाचे एका जंगली हत्तीसोबत युद्ध झाले. हत्तीच्या दातांनी सिहाला पार जखमी केले. तो खूप अशक्त झाला. सिंह जखमी झाला त्यामुळे कावळा आणि इतर सेवेकरी आता भूकेने व्याकुळ होऊ लागले. कारण जेव्हा सिंह शिकार करायचा तेव्हा या सर्वांना जेवण मिळायचे. आता सिंह सर्वांना म्हणाला की, असा शिकार शोधून आणा की मी या अवस्थेत त्याला ठार करू शकेल व तुम्हाला जेवण मिळेल. आता सर्वीकडे फिरल्यावर त्यांना काहीच मिळाले नाही.

आता यावर कोल्हा म्हणाला की, आपण उंटाला मारू या म्हणजे आपल्याला अनेक दिवस त्याचे मांस खाता येईल. आता कोल्हा सिंहाला म्हणाला की, आपण उंटाला मारू या व आपली भूक मिटवू या. यावर सिंह नाही म्हणाला, कारण उंट त्याचा अतिथी होता. आता कोल्ह्याने सिंहाला कसे बसे तयार केले. सर्वजण सिंहाजवळ आले उंट देखील आला. आता सिंह सर्वांना म्हणाला की, तुम्हाला काही मिळाले का? सर्वानी सांगितले की, काही मिळाले नाही.

आता सर्व जण एकेक करून सिंहाजवळ उभे राहिले व आम्हाला ठार करा आमची शिकार करून भूक मिटवा अशी विनंती करू लागले. पण सिंहाने काहीतरी सांगून सर्वांना ठार करणे टाळलं. आता उंटाची वेळ आली. सर्व म्हणत आहे म्हणून उंट देखील म्हणाला की, महाराज मला ठार करा व आपली भूक मिटवा. आता उंटाने हे बोलताच वाघ आणि कोल्हा उंटावर तुटून पडले व त्याला ठार केले. व सर्वानी उंटाच्या मांसावर यथेच्छ ताव मारला. बिचारा उंट सर्वानी त्याच्या विरोधात केलेले षडयंत्र समजू शकाला नाही. व आपल्या प्राणांना मुकला.

तात्पर्य : कधीही कोणावर अति विश्वास करू नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



१९८३ ई. के दौरे की समाप्ति पर ९ सितम्बर, १९८३ को दर्शनसिंह जी को कोलम्बिया के राष्ट्रपति, डॉ० कारलोस हालगोन ने कोलम्बिया का सबसे बड़ा सम्मान, 'कोलम्बिया मेडल प्रदान किया और उनकी विश्व-शांति की कोशिश और आन्दोलन को सराहा और इस आन्दोलन को

### प्रस्तावना

आगे बढ़ाने की कोशिशों को मान्यता दी। १९८६ ई. के तीसरे दौरे में दर्शनसिंह जी महाराज ११ जुलाई को संयुक्त राष्ट्र संघ के भूतपूर्व असिस्टेंट सेक्रेट्री जनरल, रॉबर्ट म्युलर के अनुरोध पर यू.एन.ओ. के हेडक्वार्टर पर गये, जहाँ विश्व शांति के विषय पर उनसे एक घंटे तक बात की। बातचीत के बाद म्युलर उन्हें सिक्योरिटी काउंसिल के हाल में ले गये जहाँ संत जी ने खड़े होकर विश्व शांति के लिए प्रार्थना की। १९८६ ई. का वर्ष यू. एन. ओ. की तरफ से विश्व शांति का वर्ष घोषित किया गया था। डॉ म्युलर ने संत जी को एक गुलाब का पौधा दिखाया जो विश्व शांति के नाम

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

भगवान कभी सजा नहीं देता हम वैसे ही डरते रहते हैं और समय नष्ट करते हैं। भगवान प्यार का सागर है। उसे इसी रूप में याद करना चाहिए। कोई भी बुरी पारिस्थिति घटती है तो उस में उलझने के बजाय यह सोचो ऐसी क्या सावधानी रखनी चाहिए कि दुबारा ऐसी घटना ना घटे। ऐसी श्रेष्ट सोच बनानें के लिए लक्ष्य रखो मुझे २०-२५

### अंतरीक बल

पेज हर रोज नये पढ़ने हैं। मन हमेशा तुलना करता रहता है। उस के पास वह वस्तु है मेरे पास क्यो नहीं है। उसकी वह वस्तु मेरे से महंगी है और मेरी वस्तु सस्ती है। जब हमें लगता है कि हम दूसरों से कम हैं तो हमें मानसिक पीड़ा होती है। हमारा समय इस उधेड़ बुन में नष्ट होता रहता है मैं कम क्यों हूं, क्या करू, कैसे करूं कि दूसरों से आगे आ सकू। कुछ लोग शरीर से स्वस्थ हैं परंतु छोटी सी अप्रिय घटना से विचलित हो जाते हैं। उनका मनोबल टूट जाता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - सुंदर विचार

ह्या भूतलावरील प्रत्येक विचार, कृती, व्यक्ती, वस्तुपासून आपण नक्कीच काहीतरी शिकत असतो, नव्हे शिकायलाच पाहिजे. क्षणाक्षणाला, मिळणाऱ्या ज्ञानात भर पडत असते. मन आणि डोळे उघडे ठेऊन, महत्वाचं म्हणजे काहीतरी शिकणारंच, हे मनापासून ठरवलं तर नक्कीच शिकता येतं. लहानग्याला अंक आणि अक्षरांची ओळख नसते, त्यावेळी, त्याच्या बोटांमध्ये पेन्सिल ठेऊन, आपण अक्षरं मिरवतो, अंक गिरवतो. अक्षरं, अंकांची ओळख झाली की शब्द, वाक्य लिहिता, वाचता येतं. एकदा लिहिता, वाचता यायला लागलं की स्वतःलाही आतुन वाचता येतं. जो व्यक्ती स्वतः ला वाचतो, तो इतरांनाही नक्कीच वाचु शकतो नव्हे वाचतोच. मग त्यानुसार कुणासोबत मैत्री करायची, कुणाच्या विचार, आवडी-निवडीसोबत आपले विचार, आवडी-निवडी जुळतात हे लक्षात येतं.

अधिकाधिक वाचनामुळं मनन, चिंतन, निरिक्षण वाढतं. बिटविन द लाईन्स एकदा समजायला लागलं की वस्तु आणि त्या वस्तुमध्ये असलेला द्रव, घन पदार्थ ह्याचाही अर्थ लक्षात येतोच. अगदी परिस्थिती सुध्दा वाचता येते. प्रतिकुल परिस्थितीवर मात करण्याचं सामर्थ्य निर्माण होतंच. विचारांच्या कक्षा विस्तृत झाल्या की काय होतं हे अनुभवुन पहा. काचेच्या ग्लासात पाणी आहे. सदर पाणी अर्धा ग्लासभर आहे. अशावेळी एखादी व्यक्ती म्हणेल ग्लास अर्धा रिकामा आहे, तर दुसरी व्यक्ती म्हणेल ग्लास अर्धा भरलेला आहे. ह्या दोघांच्या विधानांवरुन, ग्लास अर्धा भरलेला आहे म्हणणारा सकारात्मक आहे हे लक्षात येतं. तो ग्लास, ग्लासातलं पाणी, पाण्याचं प्रमाण ह्याविषयीचा सुंदर विचार त्या व्यक्तीने व्यक्त केला. नेमक्या अशाच सुंदर, सकारात्मक विचारांची गरज दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक असते. सुंदर, सकारात्मक विचार एका अर्थी आपल्यात आत्मविश्वास निर्माण करतो, आपल्यात आशावाद निर्माण करतो. ग्लास अर्धा रिकामा आहे म्हणणाऱ्या व्यक्तीचा विचार नकारात्मक आहे. त्या सदर व्यक्तीला, ग्लास अर्धा भरलेला आहे हे दिसत असुनही, अर्ध्या रिकाम्या ग्लासाविषयी तो बोलतो आहे.

अर्थात आपल्याजवळ जे आहे त्याचा सर्वात आधी विचार व्हायला पाहिजे. ह्या ठिकाणी काचेचा ग्लास म्हणजे आपण स्वतः आहोत आणि ग्लासातलं पाण्याचं प्रमाण म्हणजे आपलं शिक्षण, मिळवलेलं ज्ञान, परिस्थितीकडे पाहण्याची वृत्ती आहे. माझ्यात असणाऱ्या ज्ञानाचा, माहितीचा उपयोग, सकारात्मकतेनं केला तर, माझी दृष्टी विशाल होईल, मनात उदारपणाची भावना निर्माण होईल. जे आहे, त्याचा मी आदर करणारंच शिवाय त्याचा अभिमान वाटणारंच आहे. ग्लास अर्धा भरलेला आहे असं म्हणणारी व्यक्ती अधिक व्यापक विचार असा करिन की उर्वरित अर्धा ग्लास पाणी, मी स्वकष्टाने आणणार. त्या ग्लासात ओतणार. ग्लास पूर्ण भरेल त्यावेळी आनंद होईलंच. हे ग्लासभर पाणी, तहानलेल्या व्यक्तीस देईल. ह्या कृतीमुळे मला समाधान नक्कीच मिळेल. ह्या पध्दतीनेही आपण गरजवंताच्या पाठिशी उभा राहु शकतो लक्षात येईल. घेण्याऐवजी आपल्या जवळचं गरजवंताला देण्यात अत्यानंद असतो, आपण शारिरिक आणि मानसिक दृष्ट्या प्रसंन्न होतो. महत्वाचं म्हणजे देण्याची सवय लागते ज्यामुळं कुणाचंतरी भलं होतं.

अन्न, वस्त्र, निवारा आणि सुंदर – सकारात्मक विचार जीवन जगण्यासाठी प्राथमिक गरजा आहेत. सुंदर विचार, त्यानुसार सुंदर कृती असणाऱ्या व्यक्तीच्या सहवासात रहावं असं अनेकांना मनापासुन वाटतं. त्यांचं हे असं वाटणं म्हणजेही सुंदर विचार. कधी कधी अनपेक्षित संकट येतं त्यावेळी मनात अनेकविध विचारांचा कलकलाट सुरु होतो. मन, शरिर खचु लागतं अशा वेळीच ते विचारांच काहुर थांबवणं सर्वस्वी आपल्या हातात असतं, मन शांत ठेऊन, एक सकारात्मक विचार करुन. चुकणं हा स्वभाव असतो. जाणुनबुजुन चुक न करणं हे शक्य होतं ते फक्त एखाद्या सुंदर विचारामुळे. मनातल्या सुंदर-सकारात्मक विचारांमुळे आपल्यात ऊर्जा निर्माण होते, खुप छानसं वाटु लागतं. चेहऱ्यावर स्मित दिसतं, चेहरा प्रसंन्न दिसतो. काचेचा ग्लास पाण्याने अर्धा भरला आहे, हा सकारात्मक विचार, दैनंदिन जीवन जगतांना, वेळोवेळी करणं प्रत्येकासाठी आणि त्याच्या कुटुंबासाठीही हितकारक असणार आहे. सुंदर – सकारात्मक विचारांची सोबत जो करतो, त्याच्या सोबत मैत्री करायला अनेकजण उत्सुक असतात.

(लेख क्र.५२८)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

बाल शिवबाच्या कथा, गोट्या, चिंगी, साने गुरुजी यांच्यावरील पुस्तकांचे वाचन करावे. भारतीय संस्कृतीतले ज्ञानेश्वरी, दासबोध, गीता यांच्या वाचनाने जीवनामधील संघर्षाला न घाबरता जीवन कसे जगावे तसेच जीवनाचे महत्त्व यांचे मार्गदर्शन मिळते.

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

**१) भगवद्गीता :** भगवद्गतिचे महत्त्व सर्वांना माहीतच आहे. यामध्ये असलेली संस्कृत भाषा प्रथमतः यून नतर मराठी अनुवाद वाचावा, म्हणजे त्याचा अर्थ बाळाला देखील समजतो. संस्कृत झाल्यानंतर बाळ जेव्हा बोलू लागते तेव्हा त्याचे उच्चार स्पष्ट असतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# स्ट्रक्चरल ऑडिट : इमारतींचे आयुष्य जपायचे कसे?

आजकाल आपण वर्तमानपत्रात वाचत असतो 'बिल्डींगचा स्लॅब कोसळला' किंवा 'पुरामध्ये नदीवरचा पूल कोसळला' तर कुठे होर्डींग कोसळल्याच्या बातम्या दिसतात आणि त्या खालोखाल 'Structural Audit' या शब्दाचा वारंवार उल्लेख दिसून येतो. तर आजच्या या लेखात 'तांत्रिक उपकरणे वापरून इमारतीची तपासणी करून सद्य स्थितीचा अहवालाचे सादरीकरण करणे' म्हणजेच 'Structural Audit' म्हणून ओळखल्या जाण्याऱ्या तंत्राची माहिती जाणुन घेणार आहोत.










**स्ट्रक्चरल ऑडिट म्हणजे काय?**

जेव्हा एखादी इमारत बांधली जाते तेव्हा आर्किटेक्ट / इंजिनियर त्याचा आराखडा बनवतो, स्ट्रक्चरल इंजिनियर त्या इमारतीवर किती भार पडेल, भुकंप झाला, वारे-वादळ आली तर त्याचा किती प्रभाव असेल या सर्वांचा अभ्यास करून कॉलम, बिम, स्लॅब यांचे मुल्यांकन करतात. काँक्रिट तसेच वापरले जाणारे लोखंड कोणत्या गुणवत्तेचे हवे, हे ठरवले जाते. तांत्रिक पद्धतीने बांधलेली इमारत सुरवातीस फार उत्तम सेवा देते, पण जसा जसा काळ लोटत जातो तसा या इमारतीला नैसर्गिक आणि मानवी आव्हानांना सामोरे जावे लागते.

वर्षभर ऊन, वारा, पाऊस चालू असतो. पावसाळ्यात छतावर पाणी साठते तर कधी प्लम्बिंग मधुन पाणी झिरपते त्यातच जर काँक्रिटला तडे गेलेले असतील तर पाणी आतील लोखंडापर्यंत पोहचते. हवा आणि पाण्याचा संपर्क येऊन लोखंड आतल्या आत गंजायला लागते. त्यामुळे लोखंडाचा आकार वाढत जातो आणि आजुबाजुच्या काँक्रीटला अजुन तडे जातात. इमारतीची संरचना ही माणसाच्या हाडांसारखी असते. इमारतींमधले लोखंडे हे मानवी सांगाड्यातील हाडांसारखेच काम करतात. तीच अशक्त झाली तर इमारत कोसळायला वेळ लागत नाही. बांधकामातल्या लोखंडाचा गळक्या पाण्याशी संबंध आला की गंज चढतो व गंजलेला लोखंड अशक्त होते. लोखंड अशक्त झाले तर इमारतीचं आरोग्य धोक्यात येतं.

बऱ्याचदा इमारत बांधुन झाल्यावर घरमालकाला विविध कल्पना सुचतात. 'आहे त्या घरावर आणखी एक मजला चढवून भाड्याने देता येईल', किंवा 'घरगुती वापरासाठी बांधलेली इमारत व्यवसायिक दृष्ट्या वापरता येईल' (उदा. बँक, जिम, कार्यालये इत्यादी) काही ठिकाणी बाल्कनीचा भाग घरात घेऊन खोलीची जागा वाढवली जाते, तर काही ठिकाणी इमारतीवर मोबाइल टॉवर चढवले जातात. इमारतीच्या प्रारंभिक सांगाड्यामधे या सर्वाची तरतूद नसते. कित्येकदा स्ट्रक्चरल इंजिनिअरचा सल्ला न घेता अशी कामे केली जातात. सध्या जुन्या इमारतीचा बाहेरील भाग तसाच ठेवुन इंटेरिअर केले जाते. खर्च वाढेल म्हणून इमारतीला पडलेले तडे दुरुस्त न करता ते लपविण्याचा प्रयत्न केला जातो. पण या सर्वांचा इमारतीवर काय परिणाम होईल याचा विचार मात्र होत नाही.

अशा विविध नैसर्गिक व मानवी घटनांमुळे इमारतीच्या ताकदीवर हळूहळू परिणाम दिसायला लागतो. ज्याप्रमाणे वयोवृद्ध व्यक्तीच्या त्वचेवर सुरकुत्या येतात, हातपाय दुखायला लागतात, त्याप्रमाणे जुन्या वास्तुचे प्लास्टर खराब होते, पावसाळ्यात छताला ओलावा दिसतो, पाणी गळते, भिंतीला तडे जातात, आतील लोखंड दिसायला लागते.

जसे आपण शरीराची काळजी घेण्यासाठी नियमित हेल्थ चेकअप करतो. त्याप्रमाणेच इमारतीचा चेकअप करणे देखील गरजेचे आहे. यालाच शास्त्रीय भाषेत Structural Audit म्हणून संबोधतात. स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये इमारतीची सद्य स्थिती कळते, काँक्रिटची ताकद किती आहे, आतील लोखंड किती प्रमाणात गंजले आहे आहे, पाण्याच्या गळतीचे स्त्रोत कोणते आहेत, अजुन किती वर्ष इमारत सेवा देईल, इमारतीचे आयुष्य किती वाढवता येऊ शकते, त्या मागे खर्च किती येईल. या सर्व गोष्टींचे निदान स्ट्रक्टरल ऑडिट केल्यावर मिळते.

**स्ट्रक्चरल ऑडिट का करावे ?**

भारतात अनेक जुन्या इमारती आहेत ज्यांची ताकद कालांतराने कमी झाली आहे. अशा बिघडलेल्या वास्तुचा आणखी वापर सुरू ठेवल्यास तेथील रहिवासी आणि आसपासच्या इमारतींना धोका होऊ शकतो. अशा इमारतींचे कार्यप्रदर्शन सुधारण्यासाठी त्यांची देखभाल / दुरुस्ती वेळेवर करणे आवश्यक आहे. इमारतीच्या सध्याची क्षमता निदान करण्यासाठी स्ट्रक्टरल ऑडिट केले जाते त्यामध्ये विविध तांत्रिक उपकरणे वापरुन इमारतीची सद्य स्थिती जाणुन काय काय उपाययोजना करता येतील हे ठरविले जाते.

**स्ट्रक्चरल ऑडिट कधी करावे?**

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या उपनियमांच्या खंड क्र ७५ नुसार इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट खालीलप्रमाणे करावे

१) १५ ते ३० वर्षे वयोगटातील इमारतींसाठी ५ वर्षातुन एकदा

२ ) ३० वर्षे किंवा अधिक जुन्या इमारतींसाठी ३ वर्षातुन एकदा

पुणे व मुंबई महानगरपालिकेमध्ये ३० वर्षे जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे सक्तीचे आहे. तर अलीकडेच पिंपरी-




चिंचवड आणि नवी मुंबई महानगरपालिकेनेही ३० वर्षे जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे बंधनकारक केले आहे.

**स्ट्रक्चरल ऑडिटची गरज आहे का हे कसे ओळखावे?**

रहिवासी वा व्यावसायिक इमारतींमध्ये संरचनात्मक दोष दिसत असतील, पाण्याची गळती, प्लॅस्टर पडणे, काँक्रिट घटकांवर म्हणजे स्लॅब, बीम, कॉलम इत्यादींवर तडा गेल्याचं आढळले इमारतीमध्य चालताना अनपेक्षित हादरे जाणवत असतील तर अशावेळेस एखाद्या सक्षम स्ट्रक्चरल इंजिनियरचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**स्ट्रक्चरल ऑडिट कसे केले जाते?**

प्रथम आर्किटेक्चरल आणि स्ट्रक्चरल ड्रॉइंग्सचा अभ्यास केला जातो, सध्या इमारतीवर किती भार आहे त्यानुसार योग्य आकाराचे कॉलम आणि बिम दिले आहेत का हे बघितले जाते. जर आर्किटेक्चरल आणि स्ट्रक्चरल ड्रॉइंग्स उपलब्ध नसतील, तर सद्य स्तिथीतल्या इमारतीचा आराखडा (As Built Drawing) बनविला जातो. त्यानंतर व्हिज्युअल इन्स्पेक्शन केलं जाते

**व्हिज्युअल इन्स्पेक्शनमध्ये सामन्यतः खालीलप्रमाणे मुद्दे बघितले जातात**

– इमारतीची सामान्य माहिती गोळा करणे

– इमारतीचे नाव आणि पत्ता

– इमारतीच्या फ्लॅटची संख्या

– इमारतीच्या मुख्य वापराचे वर्णन उदा. निवासी, व्यावसायिक, संस्थात्मक

– इमारतीचा देखभालीचा इतिहास

– इमारतीची संरचनात्मक प्रणाली समजून घेणे -पाया, भिंती आणि मजले खचले आहेत का – कॉलम, बीम मध्ये विक्षेपण आणि भेगा दिसणे -प्राथमिक गरजेपेक्षा अतिरिक्त भार ओळखणे

– स्लॅबचा भार बिमवर, बीमचा कॉलमवर आणि कॉलमचा फुटींग वर अश्या संरचनेत विसंगती आहे का हे बघणे.

-इमारतीमध्ये फेरबदल ओळखणे

– पार्टीशन वॉल बदलणे किंवा नवीन बांधणे

-लोडिंगमध्ये बदल

-शौचालये, पाण्याची टाकी यांची जागा बदलणे -बाल्कनी बदलणे किंवा नवीन बांधणे

**भिंतींमधील ओलसरपणा शोधणे**

– टेरेस, टॉयलेट, प्लंबिंग लाईन, डेनेज लाईन आणि ओव्हरहेड टाक्या मधील गळती ओळखणे – जिना, लिफ्ट आणि लिफ्ट मशीन रूमची स्थिती तपासणे

व्हिज्युअल इन्स्पेक्शनचा निष्कर्ष लक्षात यावा म्हणून त्या संदर्भातली छायाचित्रे अहवालात सूचित केल्या जातात. व्हिज्युअल इन्स्पेक्शन व्यतिरिक्त काँक्रीटची वास्तविक ताकद आणि गुणवत्ता Non-Destructive टेस्ट (NDT) म्हणजेच अविध्वंसक परीक्षा द्वारे सूचित करण्यात येते. काँक्रीटची सध्याची ताकद आणि गुणवत्ता निश्चित करण्यासाठी अनेक नॉन-डिस्ट्रक्टिव्ह चाचण्या (NDT) उपलब्ध आहेत.

**रिबाउंड हॅमर टेस्ट** (Rebound Hammer Test) : काँक्रीटच्या पृष्ठभागाचा कडकपणा मोजण्यासाठी या प्रणालीचा उपयोग केला जातो.

**अल्ट्रासोनिक पल्स व्हेलोसिटी टेस्ट** (Ultrasonic Pulse Velocity Test): काँक्रिटच्या एकजीवपणाचे मूल्यांकन करण्यासाठी, काँक्रिटची ताकद, गुणवत्ता मोजण्यासाठी या प्रणालीचा उपयोग केला जातो.

**कव्हर मीटर टेस्ट** (Cover Meter Test) : बाहेरील काँक्रिट पासून लोखंड किती आत आहे हे बघितले जाते.

**हाल्फ सेल** (Half Cell Potential Test) : काँक्रिटमधील लोखंड किती प्रमाणात गंजले आहे हे जाणून घेण्याकरिता हि टेस्ट केली जाते.

**कोर सॅम्पलिंग टेस्ट** (Core Sampling Test) : ज्याप्रमाणे डॉक्टर रक्त काढून तपासणी करतात त्या प्रमाणे इमारतीमधले थोडे काँक्रिट काढून तपासणी करण्यात येते.

**कार्बोनेशन टेस्ट** (Carbonation Test) : कार्बोनेशनची वर्शीहि मोजण्यासाठी या प्रणालीचा उपयोग केला जातो.

**केमिकल टेस्ट :** काँक्रिटचे pH, sulphate, chloride या गोष्टी तपासल्या जातात.

बऱ्याचदा काँक्रिटची ताकद तपासण्याकरिता रिबाउंड हॅमर चाचणीचा उपयोग केला जातो आणि काँक्रिटचे सॅम्पल घेतले जात नाही. रिबाउंड हॅमरमुळे काँक्रीटचा पृष्ठभाग किती कडक आहे हे समजते. काँक्रिटमधले कार्बोनेशन वाढल्याने देखील रिबाउंड हॅमरचे निकाल संतुष्टपुर्ण येऊ शकतात. त्यामुळे काँक्रिटचे कोर सॅम्पल घेऊन त्या ठिकाणच्या रिबाउंड हॅमरच्या निकालांसोबत मुल्यांकन करणे गरजेचे आहे.काँक्रिटमधील झक चे प्रमाण १२-१३ असते कालांतराने ते कमी होत जाते तसेच सल्फेट आणि क्लोराईडचे प्रमाण काळानुसार वाढत जाते, यामुळे आतील लोखंडाला गंज चढायचे प्रमाण वाढते.

**स्ट्रक्चरल ऑडिटसाठी खर्च किती येतो?**

एखाद्या छोट्या-मोठ्या घरासाठी स्ट्रक्चरल ऑडिटचा अंदाजे खर्च ८००० १०,००० येऊ शकतो तर इमारतीमध्ये साधारण प्रती फ्लॅट १ बी एच के साठी १५०० आणि २ बी एच के साठी २००० पर्यंत येऊ शकतो.

(टीपः Non- Destructive टेस्ट (NDT) चा खर्च वेगळा आकारण्यात येतो. तसेच 'कामाची जागा, गंभीरता आणि स्ट्रक्चरल इंजिनियरची फी ' यानुसार दर बदलू शकतात.)

**स्ट्रक्चरल ऑडिटनंतर काय?**

स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालात इमारतीची सद्य स्थिती आणि त्या इमारतीची कार्यक्षमता वाढविण्याकरिता काय उपायोजना करता येतील हे नमूद केले जाते. त्यामध्ये दुरुस्ती (रिपेअर्स) आणि संरचनात्मक मजबुतीकरण (रेट्रोफिटिंग) या गोष्टी प्रामुख्याने आढळतात.

स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालात केवळ इमारतीची सद्य स्थिती आणि कार्यक्षमता वाढविण्याकरिता उपायोजना एवढेच नसून इमारतीविषयीचा निष्कर्ष मांडला जातो, त्यामध्ये

✻ इमारतीची स्थिती किती गंभीर आहे?

✻ केवळ दुरुस्ती करून इमारत सुरक्षित होईल का?

✻ इमारतीचे मजबुतीकरण करायचे असेल तर कुठल्या पद्धतीचा अवलंब करावा लागेल?

✻ जर इमारतीवर अतिरिक्त भर वाढवायचा असेल (उदा. पाण्याची टाकी, मशिनरी इ.) किंवा एखादा मजला वाढवायचा असेल तर काय उपाययोजना करता येतील ?

✻ दुरुस्ती आणि मजबुतीकरण करून इमारतीचे आयुष्य वाढवायचे कि पाडून री डेव्हलपमेंटला द्यायची ?

या सर्व गोष्टींचे मुल्यांकन आणि निष्कर्ष स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालात सादर केला जातो. स्ट्रक्चरल ऑडिट हे महत्त्वाचे आणि अत्यंत जबाबदार काम आहे जे मानवी जीवनाशी निगडीत आहे. व्यावसायिक तज्ञांकडून इमारतींचे नियतकालिक स्ट्रक्चरल ऑडिट करणे आणि अहवालात दिलेल्या उपायोजनाद्वारे त्वरित कार्यवाही करणे गरजेचे आहे. दुरुस्ती आणि मजबुतीकरणाचे काम नेहमीच संपूर्ण ज्ञान, योग्य निदान, इमारतीतील समस्यांचा सखोल अभ्यास, योग्य दुरुस्ती पद्धती आणि शेवटी सामाजिक-आर्थिक विचारांवर आधारित असते. स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालाची प्रभावी अंमलबजावणी इमारतीचे आयुष्य वाढवते, इमारत खराब होण्यास प्रतिबंध करते ज्यामुळे टिकाऊपणा येतो आणि मानवी जीवन सुरक्षित राहते.


**– सुयोग सुधाकर पवार**



**(M.E.structure, B.E.civil, D.C.E.)**
**स्ट्रक्चरल इंजिनियर व स्ट्रक्चरल ऑडिटर,**
**सभासद – आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर**
**Suyog Consulting Engineers Developers**
**"Krushnakunj',**
**Bijali Housing Society,**
**Shilavihar Road, Savedi, Nagar**
**Ph. No. 8668354769, 9405003900**
**Email ID - suyog.s.pawargmail.com**

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर
AESA
www.aesanagar.com
Reg. No. Mah/1303/1987 F 1350/1988/ANR

## श्री संताजी महाराज यांच्या जयंती निमित्त ८ डिसेंबरला संताजी भवन येथे महाआरती



नगर – तिळवण तेली समाजाच्या वतीने श्री संताजी महाराज यांच्या जयंती निमित्त ८ डिसेंबर रोजी संताजी भवन येथे महाआरतीचे आयोजन करण्यात आले असल्याचे ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. निता लोखंडे यांनी सांगितले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संत श्री संताजी महाराज यांच्या जयंती निमित्त दाळमंडई येथील संताजी भवन येथे सकाळी ११ वाजता सर्व समाज बांधव यांच्यावतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. वर्षभर विविध कार्यक्रम तिळवण तेली समाजाच्या वतीने राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. या वर्षी सुद्धा जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहे. या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन उपाध्यक्षा सो. शोभना धारक यांनी केले आहे.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सचिव शशिकांत देवकर, प्रकाश सेंदर, प्रसाद शिंदे, सागर काळे, गोकुळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, मनोज क्षीरसागर आदी प्रयत्नशील आहेत.

## थोर महापुरुषांच्या दीक्षा जयंतीनिमित्त आनंदधाम येथे त्रिदिवसीय कार्यक्रम




नगर – आनंदधाम ची भूमी ज्यांच्या पदस्पर्शाने, अलौकिक उर्जेने पवित्र पावन बनली आहे, असे १९ व्या शतकातील महापुरुष राष्ट्रसंत, आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी महाराज तसेच आचार्यश्रीजींचे समकालीन घोर तपस्वी कर्नाटक गजकेसरी श्री गणेशलालजी महाराज या गुरुद्वयांचा दीक्षा जयंती महोत्सव आनंदधाम येथे साजरा करण्यात येणार आहे.

९ ते ११ डिसेंबर २०२४ या कालावधीत त्रि – दिवसीय कार्यक्रमांद्वारे गुरुवरांना श्रध्दा – भक्तिचे पुष्प अर्पण करण्यात येईल. जैन धर्मात जैन भागवती दीक्षेला अनन्य साधारण महत्त्व आहे. घर – परिवार – संसाराचा त्याग करून मोक्षप्राप्तीचा हा खडतर मार्ग आहे. या खडतर मार्गावर चालून स्व – पर आत्मविकासाचे शिखर गाठणे, हे महत्प्रयास कार्य महापुरुषच करु शकतात.

आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी महाराज यांनी वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी जैन भागवती दीक्षा अंगिकार करुन जनकल्याणासाठी आपले आयुष्य समर्पित केले. श्रध्दाळू भक्तांसाठी आनंदबाबा असलेल्या आचार्यजींचा व महान तपस्वी श्री गणेशलालजी महाराज यांचा १११ वां दीक्षा जयंती महोत्सव महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म. सा., प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म. सा., संस्कार दिवाकरश्री आलोकऋषिजी म. सा., महासाध्वी श्री सत्यप्रभाजी म. सा. आदी साधु – साध्वी वृंदाच्या पावन सान्निध्यात धार्मिक कार्यक्रमाद्वारे होणार आहे.

९ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते ९:३० पर्यंत होणाऱ्या भक्तामर स्तोत्र जाप, गुरु गुणानुवाद सभा, प्रवचन व गुरु दर्शनाचा सर्व श्रावक -श्राविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न स्था. जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, अहमदनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## खेळाने शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती वाढण्यास मदत होते : जयंत येलूलकर



एसा प्रीमिअर लीग -२ बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना जयंत येलूलकर आदी. (छाया – लहू दळवी)

### एसा प्रीमिअर लीग -२ पॉवरड बाय एस आर जे स्टील स्पर्धेचे बक्षीस वितरण

नगर – एसा सभासद या उपक्रमाच्या माध्यमातून आपला कामाचा ताणतणाव कमी करण्यासह खेळ भावना जागृत करणे, आपसातील हितसंबंध दृढ करणे तसेच शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती वाढविण्यास पूरक वातावरण निर्मिती करत असल्याचे एम सी ए चे माजी सदस्य जयंत येलुलकर यांनी नमूद केले.

एसाने अहिल्यानगर मधील बांधकाम क्षेत्रातील सोळा डीलर्स, व्यावसायिक यांना प्रायोजकत्वसाठी एकत्र घेऊन एस आर जे यांच्या संयुक्त विद्यमाने बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप, जयंत येलुलकर आणि एस आर जे स्टीलचे एरिया मॅनेजर अविनाश पुरोहित प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेत १६ प्रायोजक कंपनीने त्याचे संस्थेचे सभासद असलेले खेळाडू घेऊन त्यांच्या टीम उतरवल्या होत्या. साखळी सामन्यासह एकूण ३१ चुरसीचे सामने यात घेण्यात आले. या स्पर्धेत अहिल्यानगर मधील बांधकाम मटेरियल सप्लायर्स श्री आनंद सेल्स, वैष्णवी टाईल्स अँड मार्बल्स, श्री वेंकटेश्वरा आर एम सी, श्री राघवेंद्र सप्लायर्स, पंकज स्टीलस्, पटेल सिरॅमिक, सुमतीलाल अँड सन्स, मॉडर्न आर सी सी अँड लाइम वर्क्स, ससे ट्रेडिंग कंपनी, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, ए टू झेड कन्स्ट्रक्शन, वेंकटेश इंफ्रा, अबेदिन पेंटस, आकाश सप्लायर्स, सम्राट इलेक्ट्रिकल्स यांनी खेळाडूंसह सक्रिय सहभाग घेतला.

प्रत्येक सामन्यातील सामन्याचा मानकरी पुढीलप्रमाणे दर्शन पोखरणा, किरण चौधरी, वैभव निमसे, रौनक भंडारी, आकाश ससे, प्रथमेश सोनवणे, आकाश भुजबळ, जयप्रकाश विधाते, अमेय कुलकर्णी, प्रिन्स फुलसौंदर, किरण चौधरी, आकाश ससे, वैभव निमसे, श्रीकांत चीलकरवार, झोहेब खान, प्रिन्स फुलसौंदर, दर्शन पोखरना, शुभम आठरे, उदित हिरे, यश गुगळे, शुभम देशमुख, ओंकार म्हसे, किरण चौधरी, जितेश सचदेव, अभी कोके, अनिकेत हळगावकर, परेश व्यवहारे, आकाश ससे, प्रविण शिंदे, अभी कोके आहेत. पूर्ण सिरीज मधील बेस्ट बॅटमॅन अभी कोके, बेस्ट बॉलर दर्शन पोखरणा, बेस्ट फिल्डर प्रिन्स फूलसौंदर, मेन ऑफ द सिरीज किरण चौधरी ठरले. वेंकटेश इंफ्राचे ओम आठरे ओनर आणि सलीम शेख कॅप्टन असलेली टीम विजेती ठरली तर सुमतीलाल अँड सन्स यांचे प्रफुल्ल चोरडिया ओनर असलेली आणि अनिकेत हळगावकर कॅप्टन असलेली टीम उपविजेती जाहीर करण्यात आली. अंतिम सामन्यात किरण चौधरी हे सामन्याचे मानकरी जाहीर करण्यात आले. पूर्ण स्पर्धेचे अंपायर काम चैतन्य खोलगडे आणि त्यांच्या टीमने केले. या सर्व स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन स्पोर्ट्स कमिटी अध्यक्ष जितेश सचदेव, खजिनदार भूषण पांडव आणि सचिव अभिजित देवी यांनी पाहिले.

संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी सर्व सामान्यांसह ८ दिवस चाललेल्या उपक्रमात सहभागी संस्था सभासद, सप्लायर्स आणि प्रायोजक यांचे स्वागत करून आभार मानले.

सचिन जगताप यांनी अंतिम सामन्याचा टॉस करून संस्था राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. आभार मानताना जितेश सचदेव यांनी हा उपक्रम एसा भवन बांधकाम मदत निधी साठी घेतला असल्याचे नमूद करून सर्वांच्या सहकार्य आणि सहभागाबद्दल संस्था सभासद आणि प्रायोजक सप्लायर्स यांचे आभार मानले. एसा भवन कमिटी अध्यक्ष इक्बाल सय्यद यांनी स्पोर्ट्स कमिटीने केलेली ही मौलिक मदत सर्वांच्या स्मरणात राहणार असल्याचे सांगून स्पर्धेत २० वर्षा पासून ७५ वर्ष असलेल्या सभासदांनी सहभाग घेतल्याचे सांगितले. तसेच एसा भवन बांधकाम निधी संकलित करण्यास घेतलेल्या पुढाकाराबद्दल एसा संचालक मंडळ आणि स्पोर्ट्स कमिटीचे आभार मानले. कार्यक्रमास उपाध्यक्ष विनोद काकडे, नंदकिशोर घोडके, संतोष खांडेकर, सचिन डागा, यश शहा, मयुरेश देशमुख, अन्वर शेख, संकेत पादिर, विकार काझी, शैलेश सप्रे, गौरव मांडगे, पंकज जहागिरदार, विजय पादिर, संजय पवार, संजय चांडवले, एस यू खान, सुनिल औटी, उदय तरवडे यांनी सहभाग घेतला.

सूत्रसंचालन प्रदिप तांदळे यांनी केले तर जितेश सचदेव यांनी आभार मानले.

# आयपीएल खेळाडू मुकेश चौधरी यांच्या उपस्थितीत विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचा ८ डिसेंबरला समारोप



नगर – वाडियापार्क मैदानावर विजेता क्रिकेट क्लबच्या वतीने विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचा ८ डिसेंबरला सायंकाळी स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

रणजीपटू व महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखालील आयपीएल सीएसके संघाचा जलदगती गोलंदाज मुकेश चौधरी उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते विजेत्या संघाला 'विजेता' करंडक प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती हर्ष बोरा यांनी दिली.

# नगरमध्ये ८ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा



नगर – युनिव्हर्सल अबॅकस अॅण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशनच्या वतीने ८ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. एमआयडीसी येथील स्नेहालयात होणाऱ्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष विवेक संकपाळ पाटील, उपाध्यक्ष हेमलता काळाणे, व्यवस्थापन समितीचे उज्वला मुरकुटे यांनी केले आहे.

रविवारी सकाळी या स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. तर दुपारच्या सत्रात नगरसेविका शितल जगताप यांच्या अध्यक्षतेखाली बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी स्नेहालयाचे कार्याध्यक्ष अनिल गावडे, नगरसेविका दिपाली बारस्कर, स्नेहालय अनिवासी प्रकल्पाचे अध्यक्ष हनिफ शेख, अनामप्रेमचे अजित माने, जिजाऊ ब्रिगेडच्या अनिता काळे, नवनागापूरचे सरपंच डॉ. बबनराव डोंगरे, योगा अॅण्ड एरोबिकच्या डॉ. शिल्पा बालवे उपस्थित राहणार आहे.

ही स्पर्धा ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेवल १ ते ५ व वैदिक मॅथ्स या गटात होणार आहे. ही स्पर्धा सकाळच्या सत्रात पार पडणार असून, सर्व गटातील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफीसह बक्षीस दिले जाणार आहे. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यातील स्पर्धक सहभागी होणार आहेत.

अधिक माहितीसाठी ७५१७०१७१३९ व ९०४९४८४४८४ या नंबरवर संपर्क साधावा



सवंगडी ८२ ग्रुपच्या स्नेह मेळाव्यामध्ये सहभागी झालेले ग्रुपचे सदस्य.

# 'सवंगडी ८२ ग्रुप'चा स्नेह मेळावा उत्साहात

नगर – 'नेकी की दीवार अर्थात माणुसकीची भिंत' या सामाजिक उपक्रमामुळे प्रसिद्ध असलेल्या सवंगडी ८२ ग्रुपच्या सदस्यांनी नुकताच त्यांचा स्नेहमेळावा साजरा केला. या ग्रुप मधील सर्व सवंगडी प्रत्येक तीन ते पाच वर्षांनी स्नेहमेळाव्याचे आयोजन करत असतात. यावर्षीचा स्नेहमेळावा नगर–दौंड रोडवरील हिवरे झरे जवळील 'दि विंटेज हिल्स' या रिसॉर्ट मध्ये पार पडला. या मेळाव्याला तब्बल ८२ सवंगड्यांनी हजेरी लावली. या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक सवंगडी पुणे, नाशिक, औरंगाबाद, दिल्ली व अगदी अमेरिकेतून सुद्धा आले होते.

सर्व सवंगड्यांचे अत्तर लावून, फुलांची उधळण करत व ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. फक्कड हाय टि झाल्यानंतर संध्याकाळचे प्रथम सत्र सुरू झाले व त्यात दिवंगत शिक्षकांना व सवंगड्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर शाळेवर आधारित अत्यंत सुरेख अशी प्रश्नमंजुषा घेण्यात आली. सवंगड्यांना वेगवेगळ्या ग्रुपमध्ये वाटण्यात आले व गमतीशीर सांघिक खेळ घेण्यात आले.

संध्याकाळच्या दुसऱ्या सत्रात कविता, शेरोशायरी, सोलो डान्स, कथाकथन व बहारदार ऑर्केस्ट्रा झाला. दुसऱ्या दिवशी सकाळीच पिटी व योगासनांचा क्लास देण्यात आला. ग्रुप फोटो नंतर तेथील विविध साहसी खेळांचा आनंद घेण्यात आला.

जेवणानंतर रिटर्न गिफ्ट व नगरची प्रसिद्ध चिक्की घेऊन सर्व सवंगडी परत लवकरात नक्की भेटण्याचे आश्वासन देऊन आपापल्या घरी रवाना झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत देशपांडे व सुचेता बीचे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतुल मुनोत, हिरेन भळगट, अभय जोशी, दत्ता पोंदे, सीमा भणगे, अद्वैता शेडगे, संगीता कुलकर्णी, साधना भंडारी, विनिता कुलकर्णी, अनिल एकसंबेकर, प्रदिप खराडे यांनी प्रयत्न केले.

मनोज खंडेलवाल ने बासुंदी, बर्फी तर नंदू खंडेलवाल याने खास दिल्लीवरून बालुशाही आणुन कार्यक्रमाचा गोडवा वाढवला.

# महाराष्ट्र राज्यस्तरीय टेबल टेनिस चॅम्पियन्स स्पर्धेत किरण पवार अॅकॅडमीच्या साक्षी पवारला ब्राँझ पदक



महाराष्ट्र राज्यस्तरीय टेबल टेनिस चॅम्पियन्स स्पर्धेत पटकाविलेल्या ब्राँझ पदकासह खेळाडू साक्षी पवार.

नगर – २ ते ६ डिसेंबर दरम्यान शिवछत्रपती स्टेडियम, बालेवाडी, पुणे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेत किरण पवार टेबल टेनिस अॅकॅडमीची खेळाडू साक्षी पवारने मुलींच्या १९ वर्ष वयोगटात उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ पदक पटकाविले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील अहिल्यानगर मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, रायगड, धुळे, अकोला, परभणी, अमरावती इ. जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

साक्षीने आपल्या खेळात सातत्य व आक्रमकता दाखवत फोरहँड टॉपस्पिन, बॅकहँड फ्लिक, सर्व्हिसेस तसेच सर्व्हिसेस रिटर्नचा चांगला उपयोग केला. महाराष्ट्र राज्य व पुणे संघटनेचे पदाधिकारी तसेच बाँझ पदक व प्रमाणपत्र देऊन साक्षीला सन्मानित करण्यात आले. यापूर्वीही तिला अनेक राष्ट्रीय स्पर्धा खेळण्याचा मान मिळाला आहे. इंदोर येथील राष्ट्रीय स्पर्धेत तिने पाचवे स्थान पटकाविले होते. राष्ट्रीय स्पर्धेबरोबरच राज्यस्तरीय स्पर्धे त तिने अनेक वेळा सुवर्णपदक, रौप्य पदक व कांस्यपदक पटकाविले आहेत.

साक्षी पवार ही श्री रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशन या कॉलेजची विद्यार्थिनी असून बारावी सायन्सला शिकत आहे. या यशाबद्दल श्री रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशन संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष नंदकुमार झंवर, मोहनलाल मानधना, राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते सहसचिव बजरंग दरक, मुख्याध्यापिका सौ. राधिका जेऊरकर, उपमुख्याध्यापिका श्रीमती संपदा देशपांडे, तसेच के.पी. टेबल टेनिस अॅकॅडमीच्या सर्व सदस्यांनी अभिनंदन केले. साक्षीला क्रीडा मार्गदर्शक अजित लोळगे सर व एन. आय. एस. टेबल टेनिस मार्गदर्शक राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते क्रीडा व योगशिक्षक किरण पवार सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'भारतीय क्राफ्ट एक्स्पो' ला नगरमध्ये प्रतिसाद



नगर – 'भारतीय क्राफ्ट एक्स्पो' या गृहोपयोगी व गृहसजावटीच्या वस्तूंच्या प्रदर्शनाला प्रतिसाद मिळत आहे. या प्रदर्शनात काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतच्या सर्व प्रकारच्या हँडलूम वस्तू उपलब्ध आहेत.

तांबटकर माला ग्राउंड, पारिजात चौक गुलमोहर रोड, अहिल्यानगर, एक्स साड्यांच्या खरेदीवर येथे विशेष सूट देण्यात येत आहे. लखनवी ब्युटी चिकन, काश्मिरी टॉप, भदोई कार्पेट, जयपूर बेंगल, भागलपुरी ड्रेस मटेरियल, लुधियाना टी–शर्ट, अँटिक फर्निचर, हँगिंग झुला, पानिपत सोफा कव्हर, राजस्थान चनिया चोली, राजस्थान आणि जयपूर मुखवास, मेरठ खादी शर्ट, राजस्थानी मोजडी, देवाचे पोषाख व सर्व साहित्य, जयपूर जुती, पेंटिंग फ्रेम अशा अनेक बेडशीट, लेडीज टॉप, जयपूर वस्तू प्रदर्शनामध्ये अनारकली टॉप ड्रेसेस, वेस्टर्न टॉप, वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. पिकनि टेबल, गृह सजावटीचे साहित्य, पेंटिंग फ्रेम अशा अनेक बेडशीट, लेडीज टॉप, बुक फेअर, जयपूर वस्तू प्रदर्शनामध्ये अनारकली टॉप ड्रेसेस, वेस्टर्न टॉप, वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

# पीएम रिलीफ फंडातून सहा महिन्यात २६ रुग्णांना ६१ लाख रुपयांची मदत

नगर – मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून राज्यातील २८८ आमदारांमध्ये सर्वाधिक मदत मिळवून देण्याचा बहुमान प्राप्त केलेल्या खासदार नीलेश लंके यांनी संसदेत जाऊन सहा महिन्यातच राज्याप्रमाणेच दमदार कामगिरी केली आहे. ६ महिन्यात २६ रूग्णांना त्यांनी ६१ लाख २२ हजार ५०० रूपयांची मदत त्यांनी प्रंतप्रधान सहाय्यता निधीतून करण्यात आली आहे.

विविध आजारांमुळे त्रस्त असलेल्या रूग्णांना मदत करण्यासाठी खा. नीलेश लंके कायमच अग्रेसर असतात. त्यांचे नीलेश लंके प्रतिष्ठान किंवा विविध धर्मदाय रूग्णालयांमधून ते गरजू रूग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात गेल्या अनेक वर्षांपासून उपचार मिळवून देत आहेत. विधानसभेत गेल्यानंतर त्यांनी विशेषतः मुख्यमंत्री सहायता निधीचा मोठया खुबीने वापर करून घेत राज्यात सर्वाधिक रूग्णांना या फंडातून मदत मिळवून दिली. या कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनीच त्याची माहीती अधिकृतपणे यापूर्वीच जाहिर केलेली आहे.

## खा.निलेश लंकेंकडून राज्यापाठोपाठ केंद्रा मार्फतही रुग्णांना दिलासा



### वैद्यकिय मदतीसाठी स्वतंत्र कक्ष

उपचारासाठी मतदारसंघातीलच नव्हे तर राज्याच्या कोणत्याही भागातील रूग्ण किंवा त्याचा नातेवाईक आल्यास त्यांना मदत करण्याची खा. लंके यांची भुमिका असते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या कार्यालयात वैद्यकिय कक्षाची स्थापना केली असून सबंधित रूग्णाचा प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्याचे काम हा कक्ष करतो. राज्यपातळीवरील काही तज्ञही या कक्षाला मदत करतात.

### आरोग्य शिबिराचे आयोजन

मतदारसंघात लवकरच आरोग्य शिबिर तसेच नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्याची घोषणा खा. नीलेश लंके यांनी नुकतीच केली आहे. या शिबिरात रूग्णांची तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. नेत्र तपासणीच्या माध्यमातूनही डोळ्यांसदर्भातील तक्रारी दुर करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### कोरोना संकटातील रूग्णसेवेचा अनुभव

कोरोना महामारीमध्ये जगामध्ये हाहाकार माजल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालत दोन्ही लाटांमध्ये मोठया धाडसाने कोरोना बाधितांना मदतीचा हात दिला. घाबरलेल्या रूग्णांना आधार देत दिलासा दिला. कोरोनाच्या दोन्ही लाटांमधील केलेल्या रूग्णसेवेचा, रूग्णांना होणाऱ्या यातनांचा तसेच त्यांना आधार दिल्यानंतर त्यांच्या वाढलेल्या आत्मविश्वासाचा अनुभव लंके यांच्या पाठीशी आहेत. त्यामुळे कोरोना संकटानंतर आरोग्यासाठीच्या मदतीसाठी खा. लंके हे अधिक सजग झाले आहेत.

# ज्ञानेश्वर माऊलीच्या संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त अभंग शब्दांचा जागर

## माऊली संकुल येथे आजि सोनियाचा दिनु अभंग आणि भक्तीगीतासह नृत्यमय कलाविष्कार



श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने ज्ञानेश्वर माऊलीच्या संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त अभंग शब्दांचा जागर या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

नगर – ज्ञानदेवे रचीला पाया तुका झालासी कळस या उक्तीप्रमाणे वारकरी संप्रदायाचा पाया रोवून ज्ञानेश्वरी, अमृतानुभव चांगदेव पासष्टी भावार्थदीपिका स्फुटकाव्ये अभंग, विराण्या, आदि ग्रंथातून जनसामान्यां–मध्ये संस्कार आणि विचार गीता तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून प्राकृत मराठी भाषेत श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी दिला. जगाचे अन्याय सहन करून उपेक्षित असल्याची वेदना कोणाच्या वाट्याला येऊ नये या विचाराने ज्ञानेश्वरीची ओवी आणि सर्वांच्या विश्वात्मक कल्याणासाठी पसायदान माऊलींनी जगाला दिले. आजच्या युवा पिढीला माऊलींच्या विचाराची ऊर्जा व प्रेरणा मिळावी म्हणून माऊलींचा अभंग शब्दाचा जागर करण्यात आला असल्याचे प्रतिपादन गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका वर्षाताई पंडित यांनी केले

माऊली संकुल येथे श्री गुरु माऊली संगीत विद्यालयाचे वतीने श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७२८ व्या संजीवनी समाधी सोहळ्या निमित्त आजि सोन्याचा दिनु अभंग आणि गीतांचा नृत्यमय कलाविष्कार कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास ह.भ.प. अॅड. राजश्रीताई कडलग महाराज, (रामायण–भागवत कथाकार, किर्तनकार) तसेच रामायणाचार्य ह.भ.प. गोरक्षनाथ दुतारे महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते माऊली संकुलातील विठ्ठल रुक्मिणी आणि श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिरात आरती करण्यात आली.

मंचावर ह.भ.प. अॅड. राजश्रीताई कडलग, रामायणाचार्य ह.भ.प. गोरक्षनाथ दुतारे महाराज, श्रीमती कुमुदिनी बोपर्डीकर, डॉ. नाईक, डॉ. राहूल पंडित, धनेश बोगावत, विलास बडवे, अशोक गांधी (जरिवाला), नितीन थाडे, दिनकरराव घोडके, अॅड. रविंद्र शितोळे, पद्माकर वांजळे, पंडित दाम्पत्य आदींचे हस्ते दीपप्रज्वलन करून श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री नटराजाच्या मुर्तींचे पूजन करण्यात आले.

ह.भ.प. अॅड. राजश्रीताई कडलग यांनी आपल्या ओघवत्या वाणीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे संजीवन समाधी सोहळ्याचे यथार्थ वर्णन केले तेंव्हा संपूर्ण सभागृह भावुक झाले

गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका सौ.वर्षा पंडित यांचेसह डॉ. नीरज करंदीकर, प्रा. निलेश खळीकर, आदेश चव्हाण, किरण जोशी या कलाकारांनी अभंगांचे गायन केले गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या विद्यार्थीनी ईश्वरी काळे, दर्शना दंडवते, आस्था पिंगळीकर, रिया सरोवरे, चैत्राली क्षीरसागर, राजेश्वरी खडके, गौरी साठ्ये, स्वरा जंगले, ध्रुवी पोटे, अनन्या तुंगार, समृध्दी कुटे, रुचिता ससाणे, सृष्टी गंधे यांनी सुंदर नृत्याविष्कार सादर केले. या अभंगांना तबल्यावर अजित गुंदेचा व संजय हिंगणे, सिंथेसायझरवर सत्यजित सराफ, आक्टोपॅडवर निलेश सोज्वळ, व्हायोलिनवर अनूप कुलथे आणि बासरीवर अविनाश मातापूरकर यांनी सुरेल साथसंगत केली.

सूत्रसंचालन डॉ. राजीव सूर्यवंशी यांनी अभ्यासपूर्ण रित्या वैविध्यपूर्ण शैलीत केले. अहिल्यानगर जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे तसेच सौ. वर्षा पंडित आणि चंद्रकांत पंडित यांचे हस्ते कलाकारांचे सत्कार करण्यात आले. कार्यक्रमास उद्योगपती राजेंद्र चोपडा, अशोक गुर्जर, किशोर कुलकर्णी, नितीन थाडे, अशोक गांधी, धनेश बोगावत, विलास बडवे, डॉ. हेमंत नाईक, डॉ. राहूल पंडित, पद्माकर वांजळे, रेवनाथ पठारे, लौकिक शिंगवी, डॉ. बापूसाहेब कांडेकर, उद्योजक दिलीप कर्नावट, सोनईचे डॉक्टर रंगनाथ मते, तसेच ज्ञानेश्वरी साधक आदी उपस्थित होते.

# पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या सदस्य व विश्वस्तपदावरून शरद क्यादर यांची हकालपट्टी

नगर – पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या सदस्य व विश्वस्त पदावरून शरद लिंगप्पा क्यादर यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. श्री.क्यादर यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून संस्थेच्या विरोधात व बदनामकारक कार्य करून संस्थेला सतत त्रास देण्याच्या उद्देशाने शैक्षणिक कार्यात अडथळे आणले आहेत. त्यामुळे संस्थेच्या घटनेतील कलमानुसार केलेल्या नियमांनी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची २१ नोव्हेंबर रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत बहुमताने शरद क्यादर यांची संस्थेच्या सदस्य व विश्वस्त पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण सिद्दम (सर) यांनी दिली.

संस्थेचे सचिव विनायक गुडेवार यांनी या बाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, गेल्या अनेक काळापासून शरद क्यादर हे पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या घटने प्रमाणे व हितासाठी कार्य करत नव्हते. संस्थेमध्ये मनमानी व हुकूमशाही पद्धतीने ते काम करत असे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी घेतलेल्या निर्णयाला जाणूनबुजून विरोध करणे, संस्थेच्या संचालकांना अपमानास्पद वागणूक देणे, संचालकांच्या परिवारातील सदस्यांना व्यक्तिगत खोटे मेसेज करून संस्थेची चुकीची माहिती देऊन परिवारातील व्यक्तींना मानसिक त्रास देणे, संस्थेची व संचालकांच्या विरोधात खोटी माहिती सोशल मीडियावर टाकून संस्थेची बदनामी करणे, खोटी बातमी वर्तमानपत्रात देणे, वेळोवेळी होणाऱ्या संस्थेच्या आधिकृत बैठकांना कोणतीही पूर्व सूचना न देता गैरहजर राहणे, शासकीय व पोलीस प्रशासनाला चुकीची माहिती देऊन संस्थेच्या कार्यात अडथळे निर्माण केले आहेत. संस्थेचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम यांना शिवीगाळ करून अरेरावीची भाषा वापरून धक्काबुक्की करून संस्थेचे महत्वाचे दप्तर, प्रोसिडिंग त्यांनी पळवून नेले आहे. त्यामुळे शरद क्यादर यांच्या विरोधात संस्थेने जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे तक्रार केलेली आहे. अशा अनेक प्रकारे शरद क्यादार यांनी संस्थेच्या विरोधात व बदनामकारक कार्य करून संस्थेला सतत त्रास दिला आहे. संस्थेच्या संचालकांच्या मागणी नुसार २१ नोव्हेंबर रोजी झालेल्या संस्थेच्या महत्त्वपूर्ण सभेत बहुमताने शरद लिंगप्पा क्यादर यांची संस्थेच्या सदस्य व विश्वस्त पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, माजी सचिव शंकर सामलेटी, सचिव विनायक गुडेवार, सहसचिव सविता कोटा, विश्वस्त राजू म्याना, भीमराज कोडम, स्नेहा छिंदम आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संस्थेच्या हितासाठी बहुमताने हा निर्णय घेण्यात आला.

# रद्दी विक्रीबाबत दरपत्रक पाठवण्याचे जिल्हा माहिती कार्यालयाचे आवाहन

नगर – अहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयात असलेली जुनी दैनिक वृत्तपत्र व जुने साप्ताहिक यांची दरपत्रक मागवून विक्री करावयाची आहे. यासाठी स्थानिक रद्दी विक्रेत्यांनी हे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळुन) जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर या नावाने आपले दरपत्रक या कार्यालयास १७ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारीत, १ ला मजला, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडीरोड, अहिल्यानगर या पत्त्यावर बंद पाकीटातुन पाठवावे. पाकीटावर रद्दीसाठीचे दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करावा. या कार्यालयास प्राप्त होणारी दरपत्रके १७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता उघडण्यात येतील. दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.




# नितळ त्वचेसाठी...

लाइफस्टाईल

मुलायम, तजेलदार त्वचा प्रत्येकालाच हवीहवीशी वाटते. दैनंदिन आयुष्यात केलेल्या छोट्याशा बदलांमुळे आपण निरोगी त्वचा मिळवू शकतो. त्यातच सकाळी उठल्यानंतर काही गोष्टी केल्याने नितळ त्वचेसोबतच बुद्धीही तल्लख होऊ शकते. यासाठी सकाळी उठल्यावर नेमकं काय करायला हवं याविषयी...

* सकाळी दात घासणं, तोंड धुणं यांसारख्या क्रिया केल्यानंतर तुम्ही मेडिटेशन म्हणजे ध्यानधारणा करू शकता. यामुळे तुम्हाला मन:शांती लाभेल. ताण कमी होईल. याचे परिणाम तुमच्या त्वचेवरही दिसू लागतील.



मेंदूलाही चालना मिळेल.

* त्वचेचा तजेला दिवसभर टिकवून ठेवायचा असेल तर सकाळी तुम्हाला पाच मिनिटं वेळ काढावा लागेल. त्यासाठी बर्फाचे दोन तुकडे घ्या. हळूवारपणे संपूर्ण चेहऱ्यावर घासा. फार गार वाटत असेल तर बर्फाचे तुकडे रूमालात गुंडाळून चेहऱ्यावर फिरवा.

* डोळे बंद करा. पापण्यांलगत तसंच डोळ्यांच्या खालच्या भागावरही हलक्या हातांनी बर्फ फिरवा. सायनसचा त्रास असेल तर हा उपाय टाळा.

# भारतामध्ये २५ टक्के क्षयरोगी

आरोग्य विशेष

भारताने २०२५ पर्यंत क्षयरोग या आजाराचे उच्चाटन करण्याचे लक्ष्य ठेवले होते. या कामासाठी सरकारने २०२३ या आर्थिक वर्षात ३४०० कोटी रुपयांची तरतूद केली होती. आजमितीस सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये क्षयरोगावरील उपचार मोफत असून रुग्णांना उपचारादरम्यान सकस आहारासाठी दरमहा एक हजार रुपये मिळतात; मात्र जागतिक आरोग्य संघटनेच्या नुकत्याच आलेल्या आकडेवारीनंतर या ध्येयापर्यंतचा मार्ग अवघड वाटत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने अलीकडेच एका अहवालात म्हटले आहे, की २०२३ मध्ये जगभरात ८० लाखांहून अधिक टीबीचे रुग्ण आढळले आहेत. चिंतेची बाब म्हणजे जागतिक आरोग्य संघटनेने १९९५ पासून याचा मागोवा ठेवण्यास सुरुवात केली आणि तेव्हापासून आतापर्यंत कोणत्याही वर्षात टीबीची नोंद झालेली ही सर्वाधिक संख्या आहे. ही आकडेवारी भारतासाठी अत्यंत चिंतेची बाब आहे. कारण निर्मूलन मोहीम असूनही, जागतिक क्षयरोगाच्या २५ टक्के प्रकरणे एकट्या भारतात नोंदवली जातात. २०२३ मध्ये भारतात क्षयरोगाची एकूण २५ लाख ३७ हजार प्रकरणे नोंदवण्यात आली, तर यापूर्वी २०२२ मध्ये सुमारे २४ लाख २२ हजार प्रकरणे नोंदवली गेली होती. २०२३ मध्ये जगभरात बारा लाख ५० हजार लोकांचा टीबीमुळे मृत्यू झाला, तर भारतात २०२३ मध्ये टीबीमुळे तीन लाख २० हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. टीबी हा संसर्गजन्य आजार आहे. त्याचे बॅक्टेरिया सहसा फुफ्फुसाच्या ऊतींवर परिणाम करतात. तथापि, काहीवेळा तो पाठीचा कणा, मेंदू किंवा मूत्रपिंड यांसारख्या इतर अवयवांवर देखील परिणाम करू शकतो. टीबी हा मायकोबॅक्टेरियम ट्यूबरक्युलोसिस नावाच्या जिवाणूमुळे होतो. हे जीवाणू हवेतून पसरतात आणि फुफ्फुसांना संक्रमित करतात.



टीबी हा संसर्गजन्य आजार नक्कीच आहे; पण तो सहज पसरत नाही. जेव्हा एखादी व्यक्ती संक्रमित व्यक्तीभोवती बराच वेळ घालवते, तेव्हा त्याला या आजाराची लागण होऊ शकते. जीवाणू आपल्या श्वासाद्वारे शरीरात शिरले असतील, तर बहुतेक लोकांचे शरीर या जीवाणूंशी लढण्यास आणि त्यांना वाढण्यापासून रोखण्यास सक्षम असते.

# महिला वेगाने लठ्ठ होतात?

आरोग्य चर्चा

वाढत्या वयासोबत महिलांना अनेक शारिरीक आणि मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते. अशात कौटुंबिक जबाबदारी, मुलांचे संगोपन, कामाचा ताण यासारख्या गोष्टींमुळे महिला स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. स्त्रिया बहुतेकदा घरातील सर्व कामे हाताळतात. त्यामुळे त्या स्वतःला विश्रांती देऊ शकत नाहीत. याच कारणाने त्या बहुतेक वेळेस झोप टाळतात. अशा वेळी सात तासांची झोप घेऊनही महिला थकलेल्या दिसतात. त्यामुळेच त्यांना पुरुषांपेक्षा जास्त झोपेची गरज असते.




व्यावसायिक असो की गृहिणी; ती तिच्या जबाबदाऱ्या नेहमीच पार पाडते. अशा परिस्थितीत अनेकदा असे दिसून येते, की महिला कुटुंबातील इतर सदस्यांच्या तुलनेत कमी विश्रांती घेतात आणि त्यामुळे त्यांना पुरेशी झोप मिळत नाही. त्याचा थेट परिणाम आरोग्यावर होतो. या कारणास्तव, महिलांच्या शरीरातील चरबी वेगाने वाढते आणि ते पुरुषांपेक्षा लवकर जाड दिसू लागतात. महिलांच्या आरोग्यावरील अनेक वेगवेगळ्या अभ्यासातून असे समोर आले आहे, की पुरेशी झोप न मिळणे हे महिलांच्या वाढत्या आरोग्य समस्यांचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे पुरुषांपेक्षा स्त्रियांना जास्त झोपेची गरज असते. वयानुसार झोपेच्या गरजेबद्दल तुम्ही वाचले किंवा ऐकले असेल, जसे ० ते पाच वर्षे वयोगटातील मुलांना दहा ते १२ तास, १८ ते ६४ वर्षे वयोगटातील लोकांना सात ते नऊ तास आणि ६५-९० वयोगटातील लोकांना झोपेची गरज वेगवेगळी असते. अनेक तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की पुरुषांपेक्षा स्त्रियांना जास्त झोपेची गरज भासते, कारण त्या अधिक मानसिक ऊर्जा वापरतात. एकाच वेळी अनेक कामे करतात. स्त्रियांच्या झोपेची गुणवत्ता पुरुषांपेक्षा कमी असण्याची नैसर्गिक कारणे आहेत, जसे की हार्मोनल बदल, मासिक पाळी दरम्यान बदल, भावनिक गरजा जाणवणे, रजोनिवृत्ती आदी. निरोगी राहण्यासाठी, महिलांनी दररोज झोपेची शरीराची गरज पूर्ण केली पाहिजे आणि किमान आठ ते नऊ तास पुरेशी झोप घेतली पाहिजे.

अभ्यासात असे दिसून आले आहे की, झोपेच्या व्यत्ययामुळे स्त्रियांच्या झोपेची गुणवत्ता कमी होऊ शकते. इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन सारख्या संप्रेरकांच्या बदलांमुळे स्त्रियांच्या झोपेवर परिणाम होतो. हे व्यत्यय मासिक पाळीपूर्वीच्या टप्प्यात अधिक स्पष्ट असू शकतात. चांगल्या झोपेसाठी प्रत्येक कामाचे वेळापत्रक बनवा, झोपण्यापूर्वी स्क्रीनपासून दूर राहा, रात्री कॅफिनचे सेवन करू नका, रात्री हलके अन्न खा.

# रोबोटिक शस्त्रक्रियांमध्ये वाढ

संशोधन



आजकाल शस्त्रक्रियेच्या पद्धतींमध्ये बरेच बदल झाले आहेत. आजच्या युगात, सर्जन जितका लहान छेद देऊन शस्त्रक्रिया करेल तितका चांगला मानला जातो. या बदलाचे एक कारण रोबोटिक शस्त्रक्रिया आहे. कारण त्याद्वारे लहान छेद करून शस्त्रक्रिया सहज करता येते.

रोबोटिक शस्त्रक्रियेमध्ये 'रोबो' शस्त्रक्रिया करत असतात; परंतु रोबोट स्वतंत्र मशीन नाही. त्यावर सर्जनचे नियंत्रण असते. सुलभ झाली आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेत सर्जन संगणकाद्वारे रोबोटिक हात नियंत्रित करून शस्त्रक्रिया करतात. सर्जन हे रोबोटिक हात कंट्रोलर आणि व्ह्यूइंग स्क्रीनद्वारे

'ग्लोबल मार्केट रिसर्च फर्म स्ट्रॅटेजिक मार्केट रिसर्च' (एसएमआर) च्या मते, सर्जिकल रोबोट मार्केटमध्ये २०२१च्या सुमारास ५१६ कोटी रुपये होते, जे २०३० पर्यंत वाढून २१०० कोटी रुपये होण्याची अपेक्षा आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेत दरवर्षी सरासरी २५ टक्के वाढ होत आहे.

शस्त्रक्रियेचे शास्त्र गेल्या काही वर्षांमध्ये लक्षणीयरीत्या विकसित झाले आहे. पूर्वी मानवी शरीर कापून ते आतून दुरुस्त करण्याची प्रक्रिया खूप लांब आणि गुंतागुंतीची होती. ऑपरेशनला बराच वेळ लागायचा. यंत्रांमुळे ही प्रक्रिया चालवतात. रोबोटच्या हाताला जोडलेल्या कॅमेऱ्यांमुळे सर्जन रुग्णाचे अंतर्गत अवयव पाहतो आणि समजून घेतो आणि त्यानुसार शस्त्रक्रिया करतो. ही शस्त्रक्रिया डॉक्टरांसोबतच रुग्णांसाठीही अतिशय उपयुक्त आणि फायदेशीर असल्याने लोकप्रिय होत आहे. प्रत्येक सर्जन रोबोटिक शस्त्रक्रिया करू शकत नाही. यासाठी त्यांना विशेष प्रशिक्षणाची गरज आहे. हे प्रशिक्षण शल्यचिकित्सकांनाच दिले जाते. म्हणजे फक्त ती व्यक्ती ज्याला आधीच खुल्या शस्त्रक्रियेत निपुणता आहे.

# अल्झायमर की डिमेंशिया?

खास बात

अल्झायमर आणि डिमेंशिया या दोन व्याधींची नावं आपण बरेचदा ऐकतो. हे दोन्ही मेंदूशी संबंधित विकार असून यात रुग्णाच्या स्मृतीवर परिणाम होतो. त्यामुळे हे दोन्ही विकार आपल्याला सारखेच वाटतात. स्मृतिभ्रंशाचा विकार जडलेले रुग्ण, त्यांचे कुटुंबिय तसंच सर्वसामान्यांसाठीही या दोन्ही विकारांच्या लक्षणांमधला फरक गोंधळात टाकणारा असतो. अल्झायमर आणि डिमेंशिया या दोन विकारांमधला नेमका फरक आपण समजून घेऊ या.

डिमेंशिया हा आधी उल्लेख केल्याप्रमाणे मेंदूविकार आहे. याचा रुग्णाच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम होतो. डिमेंशिया झालेल्या माणसाला संवाद साधताना तसंच दैनंदिन कामं करताना अडथळे येतात. दुसरीकडे अल्झायमर हा डिमेंशियाचाच एक भाग असून स्मृती, भाषा आणि विचार यांवर नियंत्रण ठेवणाऱ्या मेंदूच्या विविध भागांवर तो प्रभाव टाकतो. डिमेंशिया हा विकार नाही तर व्याधी म्हणजे सिंड्रोम आहे. एखाद्याचं नाव किंवा गाडी कुठे पार्क केली आहे हे विसरण्यापुरता डिमेंशिया मर्यादित नाही. ही व्याधी जडलेल्या रुग्णाला अनेक आघाड्यांवर लढावं लागतं. बऱ्याच समस्यांना सामोरं जावं लागतं.

अशा रूग्णांना संवाद आणि बोलताना अडचणी येतात. स्मृतीवर परिणाम होतो. एकाग्रता आणि लक्ष केंद्रित करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. एखाद्या गोष्टीचं आकलन करताना त्रास होतो. डोळ्यांसमोर घडणाऱ्या घटना पटकन लक्षात येत नाहीत.

अल्झायमर हा डिमेंशियाचा सर्वसाधारणपणे आढळणारा प्रकार आहे. डिमेंशिया जडलेल्या ६० ते ८० टक्के लोकांना अल्झायमर असतो. काळानुसार अल्झायमरची तीव्रता वाढत जाते. अल्झायमरमध्ये मेंदूत प्रथिनं(प्लाक) आणि फायबर्स( टँगल्स) तयार होतात. यामुळे नसांना मिळणाऱ्या संदेशांमध्ये अडथळे येतात. अंतिमत: नसांच्या पेशी नष्ट व्हायला सुरूवात होते. या आजाराच्या सुरूवातीला विस्मरणाची समस्या सौम्य स्वरूपाची असते. मात्र नंतर ती वाढत जाते.


विस्मरण, प्रश्न हाताळताना अडचणी येणं, दैनंदिन कामांमध्ये अडथळे जाणवणं, वेळ आणि स्थळ यांच्यात गोंधळ उडणं, दृष्टी अधू होणं, बोलताना शब्दांचा ताळमेळ न बसणं, वस्तू जागच्या जागी ठेवणं, निर्णयक्षमता कमी होणं, काम तसंच सामाजिक जीवनातून अंग काढून घेणं, व्यक्तिमत्त्व आणि स्वभावात बदल होणं ही अल्झायमरची लक्षणं आहेत. त्यातही भीती, गोंधळ, अस्वस्थता, नैराश्य अशाप्रकारचे बदल या रुग्णांच्या स्वभावात दिसून येतात.



अल्झायमर बरा होऊ शकत नाही. या विकारामागे अनुवांशिक कारणं असतात. जीवनसत्त्वांची कमतरता किंवा काही औषधांच्या सेवनामुळे विस्मरणाची समस्या उद्भवली तर ती बरी होऊ शकते. डॉक्टर अल्झायमरचं निदान अचूकपणे करू शकत नाहीत. त्यातच औषधांनी हा विकार बरा होत नाही. मात्र स्वभावातले बदल, विस्मरण, नैराश्य, झोपेच्या चक्रातले बदल अशा लक्षणांवर नियंत्रण मिळवता येतं.

## सकाळचा झटका ठरतो घातक!

नवसंशोधन



सकाळी येणारा हृदयविकाराचा झटका रात्रीच्या तुलनेत अधिक तीव्र स्वरूपाचा असतो, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. त्या दृष्टीने केलेल्या संशोधनाचा तपशील त्यांनी जाहीर केला आहे. 'ट्रेंड्स इन इम्युनॉलॉजी' या जर्नलमध्ये याबाबतचं संशोधन प्रसिद्ध झालं असून विविध प्रकारच्या ॲलर्जीपासून हृदयविकारापर्यंत अनेक विकार दिवसातल्या कोणत्या वेळी अधिक तीव्र स्वरुप धारण करू शकतात, हे यात नमूद करण्यात आलं आहे. या संशोधनात शास्त्रज्ञांनी उंदरांवर काही प्रयोग केले. यात सरक्याडिअन ऱ्हिदम्स आणि रोगप्रतिकारक शक्तीचा प्रतिसाद यातला संबंध तपासण्यात आला. या संशोधनाचा लाभ विविध उपचार तसंच चाचण्यांमध्ये होईल, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.


## असे घासा दात...

दंतारोग्य

तोंडाचं आरोग्य उत्तम राखण्यासाठी दिवसातून दोन वेळा दात घासणं गरजेचं आहे. पण फक्त दात घासून भागत नाही तर आपण ते किती वेळ आणि कशा पद्धतीने घासत आहोत यावर बरंच काही अवलंबून असतं. प्रत्येक वेळी दात किमान दोन मिनिटं घासणं गरजेचं आहे. दोन मिनिटं फार वाटत नसली तरी प्रत्यक्षात दात घासताना दोन मिनिटं होतातच असं नाही. त्यामुळे मोबाईलवर टायमर लावा. एखादं गाणं लावून दात घासा. दोन मिनिटं झाल्यावर थांबा. ब्रशचा फार दबाव दातांवर टाकू नका. अतिरिक्त दाबामुळे दातांच्या वरच्या थराचं संरक्षण कमी होऊन हिरड्यांमधून रक्त येऊ शकतं. दात नियमितपणे घासणं गरजेचं आहेच पण ते नेमक्या पध्दतीने घासले जाणंही महत्वाचं आहे.



# ...म्हणून हाडं ठिसूळ होतात



आपण कुठे चुकतो?

हाडांच्या आरोग्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. ठराविक वयानंतर हाडं ठिसूळ होऊ लागतात. आपल्या काही चुकीच्या सवयी याला कारणीभूत ठरतात. हाडांचं आरोग्य धोक्यात येण्यामागची कारणं जाणून घेऊ या.

* हाडांच्या बळकटीसाठी ड जीवनसत्त्व गरजेचं असतं. कोवळं ऊन ड जीवनसत्त्वाचा प्रमुख स्रोत आहे. या जीवनसत्त्वांमुळे हाडांना संरक्षण मिळतं. तसंच कॅल्शियम शरीरात शोषलं जायला मदत होते. मात्र कोवळ्या उन्हात न गेल्याने हाडांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

* हालचालीमुळे हाडं बळकट होतात. व्यायामामुळे फक्त स्नायूच मजबूत होत नाहीत तर हाडांची ताकदही वाढते. व्यायामाचा अभाव, बैठी जीवनशैली हाडांना मारक ठरते.

* धूम्रपान ही हाडांच्या दृष्टीने घातक ठरणारी सवय. धूम्रपानामुळे ऑस्टिओपोरोसिसचा धोका वाढतो, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे.

* मद्यपान आणि कार्बनयुक्त पेयंही हाडांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक टरतात. अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे हाडांना आवश्यक असणाऱ्या हार्मोन्सच्या निर्मितीवर परिणाम होतो. शिवाय शरीर कॅल्शियम योग्य पद्धतीने शोषून घेऊ शकत नाही.

# लाभ गोमुत्राचे

आयुर्वेद आणि विकार

गोमुत्राचं नाव काढल्यावर आपण नाक दाबत असलो तरी त्याच्या औषधी गुणधर्मांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. गोमुत्रातल्या गुणकारी घटकांमुळे गंभीर आजारही बरा होत असल्याचा दावा करण्यात येतो. गोमुत्राचं सेवन बरंच लाभदायी ठरू शकतं. गोमुत्रात जंतूविरोधी गुणधर्म असतात. त्यामुळे गोमुत्रामुळे विविध प्रकारच्या जंतूंचा नाश होतो. जंतूंमुळे निर्माण होणारे आजार यामुळे बरे होऊ शकतात.



आयुर्वेदानुसार वित्त, वात आणि कफ दोषांचं असंतुलन विविध विकारांना कारणीभूत ठरतं. या त्रिदोषांना नियंत्रणात ठेऊन आजार बरे करण्याची क्षमता गोमुत्रात असते. त्यामुळे याच्या नियमित सेवनावर भर देण्यात आला आहे.

यकृताचं आरोग्य टिकवून ठेवण्यात गोमुत्राची महत्त्वाची भूमिका असते. यकृताच्या कार्यात बिघाड झाला तर अनेक विकारांना निमंत्रण मिळतं. मात्र गोमुत्रामुळे यकृताला बळ मिळतं आणि त्याचं कार्यही सुधारतं.


गोमुत्रात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे गुणधर्म आहेत. गोमुत्राचं नियमित सेवन केलं तर शरीराचा व्याधींपासून बचाव होतो. जंतूंशी लढण्यासाठी शरीर सक्षम बनतं.

गोमुत्रात नैसर्गिक खनिजं मोठ्या प्रमाणावर असतात. शरीरातल्या खनिजांची कमतरता भरून काढणं यामुळे शक्य होतं. गोमुत्रातून शरीराला आवश्यक ती पोषणमूल्यं मिळतात.

## डीआरच्या वेळेत निदानासाठी...

डोळ्यांचं आरोग्य

डायबेटिक रेटिनोपॅथीचं (डीआर)निदान वेळेत झालं नाही तर कायमस्वरूपी अंधत्व येण्याचा धोका वाढतो. त्यामुळे मधुमेहींनी डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. रेटिनाच्या प्रभावी प्रतिमा मिळवण्यासाठी स्मार्टफोनचा प्रभावीपणे वापर करता येतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून डायबेटिक रेटिनोपॅथीचं वेळीच निदान करता येणार आहे. यासाठी स्मार्टफोन अधिक सक्षम करण्यावर शास्त्रज्ञांचा भर आहे. मधुमेहींच्या डोळ्यांच्या सर्वसाधारण तपासणीतून काही बाबी लक्षात येत नाहीत. मात्र नव्या तंत्रज्ञानामुळे हे अडथळे दूर होतील.




# स्नायू आकुंचन का पावतात?

व्याधी विचार

स्नायूंमध्ये गोळे येणं ही सर्वसाधारण बाब आहे. रात्रीच्या वेळी पोटरीलगतचे स्नायू अचानक आकुंचन पावतात. त्या भागात असह्य वेदना जाणवतात. काही काळानंतर परिस्थिती सर्वसामान्य होते. अनेकांना वारंवार हा त्रास जाणवतो. यामुळे झोपेवरही परिणाम होतो. स्नायू आकुंचन पावण्याची ही समस्या ( मसल स्पॅम्स) जीवनसत्त्वं तसंच काही पोषण मुल्यांच्या कमतरतेमुळे निर्माण होते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. डी ३ या जीवनसत्त्वाची कमतरता अनेकांमध्ये आढळते. रात्रीच्या वेळी स्नायू आकुंचन पावण्यामागचं हे महत्त्वाचं कारण ठरू शकतं. त्यातच डी ३ हे जीवनसत्त्व शरीरातल्या विविध हार्मोन्सच्या निर्मितीवर प्रभाव टाकतं. त्यामुळे याची कमतरता आरोग्याला मारक ठरू शकते.

स्नायू आकुंचन पावण्याच्या इतर काही कारणांबद्दल बोलायचं तर झिंक या खनिजाची कमतरताही याला कारणीभूत ठरू शकते. शरीराला झिंकची अगदी कमी प्रमाणात गरज असते. पूर्णधान्य, कठीण कवचाची फळं, विशिष्ट बिया आणि हिरव्या पालेभाज्या झिंकचे प्रमुख स्त्रोत आहेत. ब १२ हे जीवनसत्त्व मेंदूच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम करतं.



शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास स्नायू आकुंचन पावतात. ही समस्या उद्भवत असेल तर भरपूर पाणी पिणं गरजेचं आहे.

शरीराला नीट आराम मिळाला नाही तरी स्नायू आकुंचन पावतात. रात्रीची शांत झोप घेण्यावर आपण भर द्यायला हवा. तसंच शरीराला योग्य प्रमाणात विश्रांतीही मिळायला हवी. शरीरातलं मॅग्नेशियमचं प्रमाण कमी झालं तरी हा प्रश्न निर्माण होतो. चहा, कॉफीचा अतिरेक, चुकीचा आहार, पाण्याचं कमी प्रमाण यामुळे शरीरातलं मॅग्नेशियम कमी होऊ शकतं.

अनियंत्रित मधुमेह, हायपोथायरॉइडिझम, अतिरिक्त मद्यपान या कारणांमुळेही स्नायू आकुंचन पावतात.

पोटरीचे स्नायू योग्य पद्धतीने ताणले गेले नाहीत तरी ते टणक होतात. त्यामुळे नियमित योगासनं, शारीरिक हालचाल, शरीरा ताणण्याचे व्यायाम यामुळेही तुम्हाला आराम मिळू शकतो.

संतुलित आहार, पाण्याचं प्रमाण वाढवणं, विश्रांती घेणं, नियमित व्यायाम या उपायांनी तुम्ही ही समस्या सोडवू शकता.

## का खावा मुळा?

आजीबाईंचा बटवा

मुळा अनेक विकारांवर लाभदायी ठरतो. यातल्या काही औषधी घटकांमुळे कॅन्सरला प्रतिबंध होऊ शकतो. रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचं काम मुळा करतो. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी मुळा खायला हवा. यातल्या पोटॅशियममुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात रहायला मदत होते. सर्दी-खोकला झाला असेल तर आहारात मुळ्याचा समावेश करावा. मुळ्यात कफ दूर करणारे गुणधर्म असतात. बद्धकोष्ठतेची समस्या असणाऱ्यांनी मुळा खावा. यात फायबरचं प्रमाण अधिक असल्यामुळेट पचनक्रिया सुरळीत होते. आतड्यांचं आरोग्य राखण्यातही मुळा महत्त्वाची भूमिका बजावतो. मूत्रपिंडासाठीही मुळा लाभदायी ठरतो.



# ई सेवा केंद्रातून व्यक्तिगत माहिती चोरून महिला, मुलींशी संपर्क करण्याचा प्रयत्न

## मनसे विद्यार्थी सेनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, सखोल चौकशीची मागणी

नगर – नागरिकांना त्यांच्या शासकीय कामांमध्ये अडीअडचणी येऊ नये आणि त्यांची कामे लवकरात लवकर कमी वेळेत योग्य पद्धतीने पूर्ण व्हावी यासाठी शासनाने जास्तीत जास्त सेतू कार्यालय आणि ई सेवा केंद्र सुरू केले पण या ई सेवा केंद्रांमध्ये काय प्रकार चालतो यावर अंकुश ठेवण्यासाठी कुणी आहे का? असा प्रश्न पडलाय एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती चोरणे किंवा ही माहिती इतर ठिकाणी जात असेल तर हा किती मोठा गुन्हा आहे. आणि या गुन्ह्यांवर नेमकं काय होणार आहे याबद्दल कोणालाही कशाचीही भिती नाही त्यामुळे शहरातील सर्व सेतू कार्यालयाच्या चौकशी करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन केली आहे.

या निवेदनात त्यांनी एका महिलेबरोबर घडलेल्या प्रसंगाचे उदाहरण देऊन मोठा धक्कादायक प्रकार समोर आणला आहे. जुन्या महानगरपालिका मध्ये एका महिलेने तिच्या मुलाच्या नावाच्या बदलाबाबत अर्ज केला होता पण त्या अर्जाशी संबंधित कागदपत्र काढण्यासाठी महापालिकेतील लोकांनीच जुन्या महापालिकेसमोरील ई सेवा केंद्रामध्ये पाठवले. त्या ठिकाणी काही लोक असतात काम करणारे ३ जण आणि बाहेर बसणारे टवाळखोर ३० जण असतात तरी त्या महिलेने कागदपत्रांसंदर्भामध्ये सर्व माहिती देऊन ती तिथून निघून गेली.

मात्र तिला धक्का जेव्हा बसला जेव्हा तिच्या मोबाईल वर त्याच सेतू केंद्रातून एक फोन आला कारण तिने कोणालाही स्वतःचा नंबर दिला नसत नाही तिला व्हाट्सअप मेसेज वर कागदपत्र काढून देण्याच्या बहाण्याने तेथील एका युवकाने सदर महिलेला थेट व्हाट्सअप वर मेसेज केला की मी तुम्हाला मुलाचे अमुक कागदपत्र काढून देतो. त्यानंतर अवांतर बोलायला सुरुवात केली, तुम्ही काय काम करता, पाच मिनिटे फोनवर बोला वगैरे. हे फार धक्कादायक प्रकार आहे.

अशा पद्धतीने जर एखाद्या महिलेबद्दल इतका मोठा काम चुकारपणा किंवा असुरक्षितता होत असेल तर या ई सेवा केंद्रांवरती लोकांनी विश्वास ठेवायचा कसा वैयक्तिक माहिती ही या ई सेवा केंद्रांमधून जर बाहेर जात असेल आणि तेथील कर्मचारी अथवा कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेले लोक त्या वैयक्तिक माहितीचा वापर करत असतील तर हा लव्ह जिहादचाच एक प्रकार आहे हिंदू मुलींना मेसेज करणे त्यांना गोड गोड बोलून जवळीक वाढवण्याचा हा एक प्रकार आहे असल्याचेही सुमित वर्मा यांनी निवेदनात म्हटले आहे.

ही ई सेवा केंद्रे काय या धंद्यांसाठी उघडली आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. आपणास विनंती आहे की सर्व ई सेवा केंद्राबद्दल तातडीने चौकशीचे आदेश द्यावेत सर्व ई सेवा केंद्रामध्ये नागरिकांची असलेली वैयक्तिक माहिती सुरक्षित कशी ठेवता येईल आणि नागरिकांमध्ये या ई सेवा केंद्रा बद्दल सुरक्षेची भावना कशी तयार होईल यावर आपण लक्ष द्यावे अशी मागणी ही त्यांनी केली आहे.

# पटवर्धन चौक भागामध्ये मैलायुक्त गाळ रस्त्यावर


(छाया – महावीर पोखरणा)

नगर – चितळे रोड जिल्हा वाचनालय ते पटवर्धन चौक तसेच गौरीघुमट ते पटवर्धन चौक परिसरातील भुयारी गटार व रस्ता काँक्रिटीकरण काम मंजूर आहे. तसेच या कामाचे भूमिपूजन होऊन अनेक महिने लोटूनसुद्धा अजूनही महापालिकेने कामास सुरवात न केल्याने येथील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पाऊस झाल्यानंतर सदर परिसरात नवीन भुयारी गटार नसल्याने मोठ्या प्रमाणात मैलायुक्त गाळ साचून दुर्गंधी पसरते तसेच मोठ्या प्रमाणात खड्डे असल्यामुळे येथील नागरिक तसेच शाळेतील विद्यार्थी घसरून पडण्याच्या घटनाही घडलेल्या आहेत तसेच या परिसरात १० शाळा असून त्यातील विद्यार्थ्यांचे आरोग्यही धोक्यात आलेले आहे.

मध्यवर्ती शहरातील गांधी मैदान परिसरातील मागील ५० वर्षांचा पावसाच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरुपात आहे. पाऊस पडला की मंगल गेट परिसरापासून चितळे रोड, गांधी मैदान, पटवर्धन चौक, आनंदी बाजार, गाडगीळ पटांगण या परिसराला अक्षरशः नदीचे स्वरूप येत असते. अनेक नागरिकांच्या घरामध्ये तसेच दुकानात पावसाचे पाणी जाऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असते. हा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी राज्य शासनाकडून मोठा निधीही उपलब्ध झालेला आहे. तरी मनपाकडून कामाला प्रारंभ करण्यास टाळाटाळ केली जात आहे तसेच या भुयारी गटाराच्या लाईनची लांबी, रुंदी मोठ्या व्यासाची टाकण्यात यावी, यामुळे पाण्याचे वहन होताना अडचण येणार नाही. तरी सदर काम त्वरित सुरू करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# दृष्टीहीन गायकांसह आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गायकांचा रंगला 'दिल से सारेगामापा'

नगर – धनश्री म्युझिक अॅण्ड इव्हेंट मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित स्नेहालय संचलित अनामप्रेम मधील दृष्टीहीन गायकांसह आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गायकांचा दिल से सारेगामापाची संगीत मैफल शहरात रंगली होती. दृष्टीहीन गायकांना मंच उपलब्ध करुन त्यांना प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तीगीत, प्रेमगीत आणि देशभक्तीच्या हिंदी-मराठी गाण्यांनी सजलेल्या स्वरांच्या संगीत सोहळ्यात श्रोते मंत्रमुग्ध झाले.



धनश्री म्युझिक अॅण्ड इव्हेंट मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित स्नेहालय संचलित अनामप्रेम मधील दृष्टीहीन गायकांसह आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गायकांचा दिल से सारेगामापाची संगीत मैफल शहरात रंगली होती. शेजारील छायाचित्रात अनाम प्रेमचे अध्यक्ष अजीत माने, पत्रकार सुधीर लंके, हेमंत कुमार राठोर, डॉ. दमन काशीद, गायिका अंजली गायकवाड, वसंत बोरा, अंगद गायकवाड, अभिनेत्री व निर्माती सारा दुर्गा, मॉडेल प्रसाद बोगावत आदी.

## हिंदी-मराठी गाण्यांनी सजलेल्या स्वरांच्या संगीत सोहळ्यात श्रोते मंत्रमुग्ध

इंडियन आयडॉल फेम गायक हेमंत कुमार राठोर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय गायक साईराम अय्यर यांची विशेष उपस्थिती होती. टिळक रोडवरील नंदनवन लॉन येथे झालेल्या दिल से सारेगामापाचे उद्घाटन सेवानिवृत्त मेजर अशोककुमार सिसोदिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी अनाम प्रेमचे अध्यक्ष अजीत माने, पत्रकार सुधीर लंके, हेमंत कुमार राठोर, डॉ. दमन काशीद, गायिका अंजली गायकवाड, वसंत बोरा, अंगद गायकवाड, अभिनेत्री व निर्माती सारा दुर्गा, मॉडेल प्रसाद बोगावत यांच्यासह अनाम प्रेम मधील दृष्टीहीन गायक-गायिका व कलाकार उपस्थित होते.

देवा हो देवा... गणपती देवा... या गीताचे सादरीकरण करुन अनामप्रेमच्या कलाकारांनी दिल से सारेगामापा कार्यक्रमाची सुरुवात केली. गौरी या गायीकीने गायलेल्या कर्मा चित्रपटातील दिल दिया है जान भी देंगे, ए वतन तेरे लिए!.... या गीताने वातावरण देशभक्तीमय केले. तर सत्यम शिवम सुंदरम.... गीत सादर करताच उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाट अनाप्रेमच्या कलाकारांना दाद दिली.

नंदनवनच्या हिरवळीवर संगीतची रम्य संध्याकाळ बहरली होती. राहुल पेटारिया या अनामप्रेमच्या विद्यार्थ्याने एका हाताने टाळी वाजवून, हाताने तबल्याचे बोल वाजून कव्वाली व भजन सादर करुन उपस्थितांनी अवाक केले. प्रशांत त्रिभुवन यांनी माऊथ ऑर्गनचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

इंडियन आयडॉल फेम गायक हेमंत कुमार राठोर यांनी लगी तुमसे मन की लगन.... या गीताने वातावरण प्रफुल्लित केले. तर हिरे मोती मैना चाहू, मै तो चाहू संगम तेरा! हे आपल्या पहाडी आवाजाच्या शैलीत सादर करुन उपस्थितांची वाहवाह मिळवली. सुदर्शन राव यांनी सेक्सोफोनच्या वाद्याने पहिली नजर में पहला प्यार हो गया... चे संगीत वाजवले.

अंजली गायकवाड हिने भोर भरे पनघट पे!.... गीत सादर केले, तर ए वतन वतन आबाद रहे तू!... या देशभक्ती गीताने अंगावर शहारे आणले. तसेच अंजली हिने अधीर मन झाले!... या मराठी गीताने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे खास आकर्षण असलेले गायक साईराम अय्यर यांनी आशा भोसले यांच्यासह इतर महिला गायिकांच्या हुबेहुब आवाजात गीत सादर करुन प्रेक्षकांची मने जिंकली. तर अय्यर यांनी तू मिले दिल खिले!...., पहिला नशा पहिला खुमार!... या गीतांनी संगीत मैफलीत रंग भरला.

हेमंत कुमार राठोर यांनी नुसरत फतेह अली खान यांची तेरे बिन जिया जाये ना...., अब तो आदत सी है मुझको, ऐसे जीने की!... हे हिंदी चित्रपटातील गाणे सादर केले. सुनील देठे या कलाकाराने या अली रहम अली... हे गीतचे सादरीकरण केले. उत्कृष्ट वाद्यांचे सादरीकरण व गायकांचे मनाला भिडणाऱ्या स्वरांनी संध्याकाळ रंगली होती.

विविध वाद्य कलाकारांनी गायकांना उत्कृष्ट साथ दिली. यामध्ये गिटार वादनसाठी अजित अमर डमीन, संजय आठवले, संकेत देहाडे, ड्रमसेटवर प्रशांत त्रिभुवन, चाणक्य देवचक्के, काँगोवर सोनू साळवे, कच्छी ढोलवर कुमार साळवे, रिदम मशीन व क्टो पॅडसाठी बंटी ओहोळ, ढोलक व तबल्यासाठी जॉय जाधव यांनी साथ दिली. कवियत्री सरोज आल्हाट यांचे सहकार्य लाभले. आर.जे. प्रसन्ना यांनी सूत्रसंचालन केले.



जागतिक एड्स दिनानिमित्त येथील काकासाहेब म्हस्के कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीमध्ये शिक्षकांसह विद्यार्थी सहभागी झाले होते.

# एड्स दिनानिमित्त काकासाहेब म्हस्के फार्मसी कॉलेजची जनजागृती रॅली

नगर – जागतिक एड्स दिनानिमित्त येथील काकासाहेब म्हस्के कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने जनजागृती रॅली काढण्यात आली. बोल्हेगाव परिसरातील प्रमुख मार्गांवरून ही रॅली काढण्यात आली. या रॅलीत एड्स आजाराबाबत जनजागृती करण्यात आली.

महाविद्यालयातील प्रथम वर्ष बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर एक पथनाट्य देखील सादर केले. यावेळी फार्मास्युटिकल विभाग प्रमुख प्रा. शुभांगी अलभर, प्रा.प्रियंका यमगर प्रा.सायली कुलकर्णी, प्रा.कल्याणी निंभोरे व प्रा. रत्नमाला इले उपस्थित होत्या.

या उपक्रमासाठी काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष म्हस्के, विश्वस्त डॉ. सुमती म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ.दीप्ती ठाकरे व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर्किटेक्ट समीर ठाकरे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# के.जी. महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा

के.जी. महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले व त्यांनी भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे संपूर्ण देशवासीयांसाठी प्रेरणादायी असून सामाजिक न्याय, समता, आणि शिक्षण या क्षेत्रात त्यांनी सुरू केलेली क्रांती नेहमीच प्रासंगिक राहील असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. चव्हाण सविता यांनी केले तर आभार डॉ.वर्षा कीर्तने यांनी मानले. याप्रसंगी प्रा. आरती खेडकर, सौ.अमृता मुळे, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# दुकानातून चोरी; साहित्य लंपास

नगर – बंद दुकानाच्या छताचा पत्रा उचकाटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून दुकानातील पितळी बुश व जुने कॉपर वायर असे ६० हजार रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची घटना नगर दौंड रोडवरील अरणगाव येथील मोटार रिवायडींग दुकानात शुक्रवारी (दि.६) सकाळी उघडकीस आली आहे.

याबाबत प्रकाश भास्कर माने (वय ३८, रा. बाबुर्डी घुमट ता. नगर ) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी माने यांचे अरणगाव येथे मोटार रिवायडींग चे दुकान आहे. हे दुकान त्यांनी गुरुवारी (दि.५) रात्री नेहमीप्रमाणे बंद करून ते घरी गेले. त्यानंतर रात्रीच्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद दुकानाच्या छताचा पत्रा उचकटून आत प्रवेश केला व दुकानातील ४० हजार रुपये किंमतीची पितळी बुश आणि २० हजार रुपये किमतीचे कॉपर वायर असे ६० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले.

प्रकाश माने हे शुक्रवारी (दि.६) सकाळी दुकान उघडण्याकरता आले असता त्यांना हा प्रकार निदर्शनास आला. याबाबतची माहिती त्यांनी नगर तालुका पोलिसांना कळविली. ही माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर प्रकाश माने यांनी दिलेले फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (४), ३३४ (१), ३०५ (अ) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. तपास महिला पोहेकॉ. कविता हरिश्चंद्रे करीत आहेत.

# फॅशन डिझायनिंगच्या माध्यमातून उज्वल भवितव्याची संधी

## विनायक देशमुख यांचे प्रतिपादन

नगर – सध्या महिला आणि पुरुषांच्या वस्त्र प्रावरणाबाबतच्या आवडी निवडी वेगाने बदलत आहेत. त्यामुळे या विस्तारणाऱ्या बाजारपेठेची पूर्तता करण्यासाठी फॅशन डिझायनिंगच्या विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्य घडविण्याची संधी उपलब्ध आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील आय.एस.डी.टी. या संस्थेचे अध्यक्ष विनायक देशमुख यांनी केले.

इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (आय.एस.डी.टी.) या संस्थेत फॅशन डिझायनिंगच्या विद्यार्थिनींसाठी फॅब्रिक कटवर्क या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री.देशमुख बोलत होते.

यावेळी संस्थेच्या संचालिका पूजा देशमुख, फॅब्रिक कट वर्क विषयातील तज्ञ राखी पेटकर, फॅशन डिझायनिंग विभागप्रमुख पूजा पतंगे, मेधा आसने, सानिका बार्शीकर, स्मिता बडाख, रोहन चारगुंडी आदी उपस्थित होते.


आय.एस.डी.टी. या संस्थेत आयोजित करण्यात आलेल्या फॅब्रिक कटवर्क कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या कामाची पाहणी करताना संस्थेचे अध्यक्ष विनायक देशमुख, विषय तज्ञ राखी पेटकर, विभाग प्रमुख पुजा पतंगे.

## आय.एस.डी.टी.त कटवर्क कार्यशाळा

यावेळी मार्गदर्शन करताना श्री.देशमुख म्हणाले, पूर्वी फॅशन हा केवळ महिला आणि मुलींचा विषय समजला जात असे. आता मात्र पुरुषांमध्येही फॅशनेबल कपडे वापरण्याचा कल वाढला आहे. त्यामुळे फॅशन डिझायनिंग क्षेत्रातील रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी दुपटीने वाढल्या आहेत. देशातील फॅशन उद्योगात सध्या चारशे पेक्षा जास्त प्रकारचे रोजगार उपलब्ध आहेत. डिझायनरच्या कौशल्यानुसार त्याला चांगला पगार मिळतो. नवीन फॅशन डिझायनरला प्रति महिना रुपये २५००० इतका पगार मिळतो. तसेच थोड्या अनुभवानंतर विद्यार्थ्यांना वार्षिक पाच लाखापासुन ऐंशी लाखापर्यंत पगार मिळत आहे. सध्या अनुभवी फॅशन डिझायनर्सला वार्षिक ऍलनसोली (५.६ लक्ष), लेवीचे (६.२ लक्ष), रेमंड (५.५ लक्ष), आदिदास (७.४७ लक्ष), जरा (६.८ लक्ष), मार्क्स अँड स्पेन्सर (६.११ लक्ष), पॅन्टॅलून (५ लक्ष), लपवा (५.८ लक्ष), जीवनशैली (५.२ लक्ष) इतका पगार मिळत आहे. याशिवाय सब्यसाची मुखर्जी, अनामिका खन्ना, मनीष मल्होत्रा, रितू कुमार, राजेश प्रताप सिंग अशा नामांकित फॅशन डिझायनर्सचे वार्षिक उत्पन्न १० कोटी पेक्षा जास्त आहे. विद्यार्थ्यांनी पारंपारिक शिक्षणाऐवजी फॅशन डिझायनिंग सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा आणि आपले भवितव्य उज्वल करावे, असे आवाहन श्री.देशमुख यांनी केले आहे.

# ज्या किल्ल्यांवर इतिहास घडला ते किल्ले जपणे गरजेचे : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे

नगर – गड-किल्ले हेच महाराष्ट्राचे खरे वैभव आहे. त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. पुढच्या पिढीला इतिहास सांगायचा असेल, तर इतिहास ज्या किल्ल्यांवर घडला ते किल्ले जपणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले.

स्नेहबंध फाउंडेशनच्या वतीने दिवाळी निमित्त घेण्यात आलेल्या किल्ले बनवा स्पर्धेतील विजेत्यांना जिल्हा कृषि सभागृहात पारितोषिक वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, शिल्पकार बालाजी वल्लाल, सचिन पेंडूरकर, निशांत पानसरे आदी उपस्थित होते. या स्पर्धेत पहिला क्रमांक धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान, द्वितीय श्री सप्तशृंगी माता मंडळ, तृतीय मुंजोबा बाल मंडळ, उत्तेजनार्थ शिवराय मित्र मंडळ, निरज यादव, ओजश्री भंडारी यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.


स्नेहबंध फाउंडेशनच्या वतीने दिवाळी निमित्त घेण्यात आलेल्या किल्ले बनवा स्पर्धेतील विजेत्यांना जिल्हा कृषि सभागृहात पारितोषिक वितरण करण्यात आले.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, मुलांच्या मनात असलेले गडकिल्ले ते प्रत्यक्षात साकारण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांच्या प्रयोगशीलतेला आणि कल्पकतेला वाव मिळतो.

या किल्ले बनवा स्पर्धेतून महाराष्ट्राचा मराठमोळ्या इतिहास संस्कृतीची आठवण ताजी झाली.

